

ही पावले कुठे बरे जातात ?

मला यांचा शोध घेऊ दे।

कुठेही पाहिल तरी मला पावलंच दिसतात

आकाशाच्या निळ्या मुलायम रेतीत सुद्धा

पावलांचे ठसे उमटलेले मी पंहातो.

अगदी दूरवर, जेथवर दृष्टी जाते तेथवर.

# 'स्व' - रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००४

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००४

## अंतरंग


**संपादक**
श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**
श्री. शिरीष पटवर्धन
सौ. बागेश्री पोंक्षे
श्री. सुनील कुलकर्णी
श्री. कृ. गो. लवळेकर

**छपाई**
प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.
सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ४११ ०११. येथे प्रसिद्ध केले.

**संपादक**
श्री. जयंत शंकर कवठेकर
संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४
(कार्यालय) २६१२१७०४, २६१३४३१०
किंमत रूपये ५०/-
वार्षिक वर्गणी रूपये १००/-
(विशेषांकासहीत)
आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त
चेक अथवा ड्राफ्ट
'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावा.


**वार्षिक विशेषांक**


- हृद्गत
- कै. कृ. ल. पटवर्धन - जीवनपट
- आदरांजली - प्रसार माध्यमांची
- श्रध्दांजली लेख
  - श्री. प्रतापराव पवार
  - श्री. गिरीश प्रभुणे
- विशेष लेख
  - श्री. हस्तिमलजी
  - कु. लता टिळेकर
- वार्षिक वृत्त
- आर्थिक आघाडीवरून.....



मुखपृष्ठ : श्री. अवधूत फडणीस ☆ मुखपृष्ठावरील छायाचित्र : श्री. उदय गुजर ☆ रेखांकने : सौ. मेघा राऊत

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

संस्थापक : कै. कृ. ल. पटवर्धन

## सन्माननीय सभासद

* पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर * श्री. अविनाश वारदेकर

## कार्यकारी समिती

*अध्यक्ष*

*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

*उपाध्यक्ष*

*श्री. प्रतापराव पवार*
*श्री. उदय गुजर*

*कार्याध्यक्ष*

*श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ*

*सहकार्याध्यक्ष*

*श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी*
*श्री. शिरीष पटवर्धन*

*कोषाध्यक्ष*

*श्री. श्रीकांत सामळ*

*कार्यवाह*

*श्री. संजय तांबट*

*सहकार्यवाह*

*श्री. ज्ञानेश पुरंदरे*    *श्री. अविनाश जोशी*    *श्रीमती पुष्पाताई नडे*

*सदस्य*

*श्री. कन्हैयालाल बलदोटा*
*श्री. रामभाऊ डिंबळे*
*सौ. बागेश्री पोंक्षे*
*श्री. सुनील कुलकर्णी*
*श्री. विनोद बिबवे*
*श्री. अरविंद केळकर*
*श्री जयंत कवठेकर*
*ॲड. सौ. निलिमाताई गोखले*
*प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर*
*श्री. विलास कुलकर्णी*
*कु. दीपाली पवार*
*श्री. पराग लकडे*

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**
**आयकर सवलत कलम ८० जी प्रमाणे.**

संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१० (निवास) २४२२१७७०
ई-मेल : swaroopwardhinee@vsnl.net    वेबसाईट : http://www.geocities.com/wardhinee/

**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत

रौप्यमहोत्सवी वर्षातच संस्थेच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. पदाधिकाऱ्यांच्या नावांमध्ये, पदांमध्ये बदल ही स्वाभाविक गोष्ट आहे. त्यामुळे नवी कार्यकारिणी घोषित झाल्यावर या बदलांचे काही वाटले नाही. कारण वर्धिनीचे संस्थापक श्री. किशाभाऊ पटवर्धन हे वयोपरत्वे कार्यकारिणीमध्ये नसले, तरी वर्धिनीच्या कामासाठी कायमच उपलब्ध होते. पण परमेश्वराच्या मनात काही वेगळेच होते. २९ जुलै २००४ रोजी श्रद्धेय श्री. किशाभाऊंचे दुःखद निधन झाले. त्याक्षणी मात्र जबाबदारीच्या ओझ्याची जाणीव सर्वांनाच प्रकर्षाने जाणवू लागली.

उपेक्षितांमधील चुणचुणीत बुद्धिमान मुलामुलींसाठी निवृत्तीनंतर पंचवीस वर्षे कै. किशाभाऊंनी शब्दशः जी पायपीट केली, त्यातून वर्धिनीचे काम उभे राहिले. समाजाच्या वाढत्या अपेक्षांच्या कसोटीला उतरायची जबाबदारी आता नव्या पदाधिकाऱ्यांबरोबरच युवक-युवती कार्यकर्त्यांना यशस्वीपणे पार पाडावी लागणार आहे.

बदललेल्या एकूण वातावरणामुळे विद्यार्थ्यांना तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे. या तीव्र स्पर्धेच्या वातावरणात वर्धिनीची पार्श्वभूमी लाभलेली युवक-युवती मागे पडणार नाहीत, याकडे तर लक्ष द्यावेच लागेल, पण त्याच वेळी कै. किशाभाऊंचा जो आग्रह होता की, "या सर्व धडपडीतून समाजाची सेवा करणारे कर्तृत्ववान 'सेवेकरी' उभे रहावेत." याकडेही लक्ष द्यावे लागेल. याच आग्रहापोटी ते वेळोवेळी सकारात्मक आणि प्रेरणादायी 'सु'भाषिते, 'सु'वचने कार्यकर्त्यांपुढे ठेवीत असत. अशा शेकडो वचनांचा लिखित संग्रह त्यांनी केला होता. अत्यंत डोळसपणे त्यांनी निवडलेली ही वचने आहेत. त्यातील काही वचने या अंकाच्या प्रत्येक पानावर तळटीपेमध्ये सादर करीत आहोत.

या पार्श्वभूमीवर वर्ष २००४ मधील झालेल्या कामाचे वृत्त आपल्यासमोर ठेवीत आहोत. आपल्या सूचना, नव्या कल्पना कळवू शकलात तर आनंद वाटेल.

स्वये आपण कष्टावे / बहुतांचे सोशीत जावे ॥ झिजोनी कीर्तीस उरवावे । नाना प्रकारे - समर्थ रामदास

## कै. कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन जीवनपट

- जन्म दिनांक - २५ डिसेंबर, १९२०
- शिक्षण - बी एस्सी (ऑनर्स), एम्. एड्.

कार्य परिचय -

- १९४२च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयीन शिक्षण सोडून दिले.
- १९४५ ते १९५१ या कालावधीत रा. स्व. संघाचे प्रचारक म्हणून धुळे-चाळीसगाव या भागात काम केले.
- प्रचारक म्हणून काम करायचे थांबविल्यानंतर पुण्याच्या राजा धनराज गिरजी विद्यालयात शिक्षक म्हणून रूजू झाले.
- राजा धनराज गिरजी विद्यालयातून डिसेंबर १९७८ मध्ये मुख्याध्यापक पदावरून निवृत्त.
- ज्ञानप्रबोधिनी या संस्थेच्या स्थापनेपासून कार्यकर्ता या नात्याने विविध कामात सहभाग. ज्ञानप्रबोधिनीचे संपर्क अधिकारी म्हणून १९६४ ते १९७६ या कालावधीत काम केले. विविध क्षेत्रातील गुणी व्यक्तींना प्रबोधिनीच्या संपर्कात आणले.
- शिक्षक म्हणून काम करीत असताना अनेक गुणी परंतु गरजू विद्यार्थ्यांना आधार मिळाला. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे सोने झाले. अशा प्रकारच्या कामातूनच निवृत्तीनंतरच्या कामाची दिशा त्यांच्या मनामध्ये पक्की झाली.
- रामकृष्ण मिशन, विवेकानंद केंद्र अशा संस्थांच्या कामातही ते सक्रीय होते.
- डिसेंबर १९७८ मध्ये निवृत्त झाल्यानंतर लगेचच म्हणजे १ जानेवारी १९७९ पासून एका वेगळ्या शैक्षणिक प्रकल्पाची सुरुवात करण्यासाठी स्वतःला पूर्णवेळ झोकून दिले. 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने पुढे हेच काम समाजाला परिचित झाले. 'आर्थिक किंवा सामाजिकदृष्ट्या उपेक्षित समाजघटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास' हे या कामाचे प्रमुख सूत्र नक्की झाले. १३ मे, १९७९ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना. स्थापनेपासून कार्याध्यक्ष या नात्याने संस्थेच्या कामाला वाहून घेतले.
- अनौपचारिक, शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून सुरू झालेल्या या प्रकल्पातून आजपर्यंत अनेक गुणी विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने विकास झाला आहे. अनेक कर्तृत्ववान मुला-मुलींना या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजासाठी काम करण्याची प्रेरणा मिळाली. पूर्णवेळ काम करणारे कार्यकर्तेही यातून निर्माण झाले.
- १९८८ च्या मे महिन्यात संस्थेने स्वतःच्या वास्तूत प्रवेश केला. स्वतःच्या वास्तूचे स्वप्न पटवर्धन सरांनी केलेल्या अफाट कष्टांमुळे सत्यात उतरले. दोन मजल्यांचे बांधकाम असलेली ही वास्तू सुरू झालेल्या विविध उपक्रमांमुळे अपुरी पडू लागली. पाहता पाहता १९९३ मध्ये आणखीन दोन मजल्यांचे बांधकाम पूर्ण झाले.

एक एक पाऊल उचली, चाल निश्चयाने। नको बावरूनी जाऊ, नियतीच्या भयाने ।

- या महत्वाकांक्षी बांधकाम प्रकल्पासाठी कै. पटवर्धन सरांनी वयाच्या पंचाहत्तरीतही पुणे-मुंबईच्या सतत प्रवासातून आवश्यक तो निधी उभा केला.
- कै. कृ. ल. पटवर्धन यांच्या प्रेरणेमुळे अनेक प्रकल्प वर्धिनीत सुरू झाले आणि आकाराला आले.
- या वाढत्या विस्तारामुळे निधीची आवश्यताही वाढू लागली. त्यासाठी अधिक काही प्रयत्न करावेत म्हणून वयाच्या अठ्याहत्तराव्या वर्षी त्यांनी इंग्लंड व अमेरिका या देशांचा चार महिने प्रवास केला. शेकडो हितचिंतक मिळविले आणि मोठ्या प्रमाणावर निधीही मिळविला.
- कै. कृ. ल. पटवर्धन यांनी केलेल्या समाजसेवेची दखल शासनाने आणि समाजाने वेळोवेळी घेतली. त्यांच्या विषयीची कृतज्ञता अनेक पुरस्कारांच्या रूपाने प्रकट केली. श्री. पटवर्धन सरांना आजवर अनेक पुरस्कार मिळाले त्यापैकी काही.खालीलप्रमाणे आहेत -
- आदर्श शिक्षक पुरस्कार - पुणे महानगर पालिका (१९७८ व १९८८)
- श्रीमती रमाबाई औटी विकास प्रतिष्ठान तर्फे सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल 'देवल पुरस्कार' (हस्ते श्री. अटलबिहारी वाजपेयी -१९९१)
- ॲड. डी. आर. नगरकर फौंडेशनतर्फे सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल मानपत्र व पुरस्कार (१९९१)
- टिळक नगर शिक्षण संस्था, डोंबिवली यांचे तर्फे 'तेजस पुरस्कार'
(हस्ते श्री. वि. वि. चिपळूणकर, शिक्षक संचालक)
- ज्येष्ठ नागरिक संघातर्फे पुरस्कार (१९९५)
- शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल श्री. एस. एल. गद्रे पुरस्कृत कै. ल. ग. गद्रे पुरस्कार (महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड, १९९५)
- रोटरी क्लब-पुणे मिड टाऊन च्या वतीने 'सर्विस एक्सलन्स प्रोग्रॅम ॲवॉर्ड
- विद्या सहकारी बँकेचा 'विद्या व्यास' पुरस्कार (हस्ते श्री. नानाजी देशमुख)
- शारदीय सिस्टिम तर्फे शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल पुरस्कार (हस्ते डॉ. श्री. विजय भटकर)
- रमा-श्रीधर स्मृती न्यास पुरस्कार
- स्वामी विवेकानंद स्मृतीशताब्दी समिती, कोथरूड तर्फे पुरस्कार (हस्ते श्री. राम शेवाळकर)
- नानासाहेब दांडेकर चॅरिटेबल ट्रस्ट पुरस्कार
- फाय फौंडेशन पुरस्कार (१९९६- हस्ते श्री. अर्जुनसिंग)
- रोटरी क्लब - पुणे पर्वती यांचे तर्फे 'चैतन्यदीप पुरस्कार (१४.६.२००४) हस्ते श्री. अनंतराव दीक्षित, संपादक दै. सकाळ

जनी जनार्दन बघतो का मी ? घेतो कितीतरी, देतो किती मी?

## प्रसारमाध्यमांनी स्वर्गीय किशाभाऊंना वाहिलेली आदरांजली

'वयाच्या ८४ व्या वर्षी 'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कृष्णाजी लक्ष्मण तथा किशाभाऊ पटवर्धन यांचे गुरूवार दिनांक २९ जुलै, २००४ रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले.' अशा शब्दात सर्वच वृत्तपत्रांनी तसेच आकाशवाणी, ई टी.व्ही. वाहिनी आदि प्रसारमाध्यमांनी स्वर्गीय किशाभाऊंच्या निधनाचे वृत्त सर्वांपर्यंत पोचवले.

स्वर्गीय किशाभाऊंच्या कामाचे मोल सर्वज्ञात आहे. वृत्तपत्रांचाही याला अपवाद नाही. या सर्व प्रसारमाध्यमांनी त्यांच्या कामाचे मोल जाणले होते. दि. ३० जुलै २००४ ची यासंबंधीची काही बोलकी वृत्तांकने पुढे देत आहोत.

**दैनिक सकाळ** "---- ते पुण्याच्या राजा धनराज गिरजी विद्यालयात शिक्षक म्हणून रूजू झाले. हे काम करताना त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ औपचारिक शिक्षण दिले नाही, तर त्यांच्यात शिस्त, नम्रता, सत्यप्रियता कशी येईल याकडेही लक्ष दिले. विद्यार्थ्यांतील सुप्त गुणांचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

आर्थिक व सामाजिकदृष्ट्या उपेक्षित असणाऱ्या घटकांतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी १३ मे १९७९ रोजी 'स्व'-रूपवर्धिनीची स्थापना केली. बारा मुलांना घेऊन सुरू केलेल्या या प्रकल्पाचा आज मोठा विस्तार झाला आहे. या प्रकल्पासाठी काम करणारे पूर्णवेळ कार्यकर्तेही निर्माण केले शिवाय कार्यकर्त्यांचा मोठा संचही त्यांनी घडवला...."

**दैनिक लोकसत्ता :-** "------ शिक्षक म्हणून त्यांचे काम वैशिष्ट्यपूर्ण राहिले. गुणी गरजू विद्यार्थ्यांना पटवर्धन सर हा मोठाच आधार वाटत असे. --- उपेक्षित व गुणवान विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे हे काम - 'स्व'-रूपवर्धिनीचे हे काम - वाढवण्यासाठी पटवर्धन यांनी दिवस-रात्र अपार कष्ट केले. संस्थेच्या माध्यमातून पुण्याच्या पूर्व भागातील हजारो उपेक्षित, झोपडपट्यांमधील मुलांना त्यांनी शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आणि या मुलांचा सर्वांगीण विकासही घडवून आणला. याच कामातून शेकडो कार्यकर्त्यांची फौज त्यांनी उभी केली. त्यातील अनेक युवक, युवती काही वर्षे घरदार सोडून समाजाच्या कामासाठी बाहेर पडले...."

**दै. लोकमत, दै. केसरी, दै. प्रभात दै. सामना :-** ".... बुद्धिमत्ता समाजाच्या सर्व स्तरांमध्ये आहे. तिला विकासाची संधी व वातावरण मिळाले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच उपेक्षित आणि गुणवान विद्यार्थ्यांच्या विकासाचे काम त्यांनी सुरू केले. प्रेरणादायी शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधीलकीचे भानही विद्यार्थ्यांना आले पाहिजे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले...."

साप्ताहिक विवेकनेही स्वर्गीय किशाभाऊंना खास लेखांद्वारे आदरांजली अर्पण केली.

तसेच सर्व वृत्तपत्रात नामवंतांनी स्वर्गीय किशाभाऊंच्या पार्थिवाचे घेतलेले अंत्यदर्शन व अत्यंत शोकाकुल वातावरणात वैकुंठ स्मशानभूमीत किशाभाऊंच्या पार्थिवावर झालेले अंत्यसंस्कार यांचा समयोचित शब्दांत निर्देश केला आहे. 'स्व'-रूपवर्धिनी या सर्व प्रसारमाध्यमांची कृतज्ञ आहे.

समाजसेवी संस्थेचे सभासदत्व म्हणजे दागिना नव्हे, व्रत आहे.

# किशाभाऊ पटवर्धन

श्री. प्रतापराव पवार, उपाध्यक्ष-'स्व'-रूपवर्धिनी.

पुण्यात व्यवसायासाठी आल्यावर अंधशाळेमुळे माझा सामाजिक क्षेत्रात काही अंशी सहभाग सुरू झाला. काळाबरोबर ओळखी वाढू लागल्या. परिचयाबरोबर मैत्रीमध्ये रूपांतर होऊ लागले. ज्यांचा स्नेह हा कायमस्वरूपी मैत्रीमध्ये परिणत झाला, त्या प्रमुख व्यक्तींपैकी एक म्हणजे किशाभाऊ पटवर्धन.

डॉ. अच्युतराव आपटेंप्रमाणेच किशाभाऊंचे आयुष्य विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी निगडित झालेले होते. आधी ते शिक्षक म्हणून आणि निवृत्त झाल्यावर त्याचे क्षेत्र त्यांनी व्यापक केले. संघाचा त्यांचा मूळचा पिंड होता. त्यांनी समाजातील पीडित मुलामुलींसाठी घेतलेले कष्ट अतुलनीय होते. अभ्यास, संस्कार, प्रगलभता यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये घडवून आणलेले बदल हे आश्चर्य वाटावे इतके मोठे होते. याच त्यांच्या ध्येयवादामुळे मी त्यांच्याकडे आकर्षित झालो. आमच्या २५-३० वर्षांच्या सहवासात त्यांना मी नेहमी उत्साही, आशावादी, प्रयत्नशील या रूपात पाहिले. अनेकदा सकाळी मला आलेला पहिला फोन किशाभाऊंचा असे. त्यांचा आग्रह, कामाचे स्वरूप, गरज यांबाबत त्यानां होकार देण्याशिवाय पर्याय नसे. हा माणूस इतक्या तळमळीने काम करतो. त्याला आपण आपली अडचण कशी सांगणार, असा विचार काही वेळा येत असे.

तसे किशाभाऊंनी सतत माणसे जोडण्याचाही ध्यास आयुष्यभर घेतला. पुढील पिढी तयार करण्यासाठी ते सातत्याने विचार करीत. आपल्याप्रमाणेच संस्थेला वाहून घेणाऱ्या पिढीबद्दल त्यांना मनापासून समाधान होतं. शिरीष पटवर्धनपासून अनेक तरूण कार्यकर्त्यांची फळी त्यांनी उभी केली. माझ्यानंतर संस्था मागे पडणार नाही, असे ते मला नेहमी सांगत. माझ्यासारख्या अनेक हितचिंतकांचा या कार्याला कायमचा पाठिंबा राहील, याबद्दल ते दक्ष असत. जी व्यक्ती समाजहितासाठी स्वतःला वाहून घेते, चोवीस तास बारा महिने एकच ध्यास जिला आहे, अशा वेळी त्याला सहकार्य हेही चोहोबाजूंनी मिळते. त्यांच्याबद्दल साशंकता व्यक्त केलेल्या व्यक्तीसुद्धा नंतर सहकार्य द्यायला लागल्या, कौतुक करायला लागल्या.

माझ्या मागे लागून ते डॉ. बानू कोयाजींना भेटले. सुरवातीला त्या तयार नव्हत्या. संघ हा त्यांच्या दृष्टीने काळजीचा भाग होता. पण काम चांगले असल्यास अशा गोष्टी बानूबाई बाजूला ठेवत, याची मला कल्पना होती. संघ अथवा राजकीय पक्ष यापासून मीही दूर राहतो. पण व्यक्तीच्या कामाचे स्वरूप सामाजिक असल्यास कामाला महत्व द्यावे ही माझीही भूमिका होती. त्याचमुळे मी त्यांची किशाभाऊंबरोबर आग्रहाने ओळख करून दिली. अर्थातच ज्याचे रूपांतर त्या उभयतांच्या स्नेहामध्ये झाले. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

समाजातील अनेकांचा स्वरूपवर्धिनीशी परिचय व्हावा, तसेच तेथील विद्यार्थ्यांना या लोकांचा सहवास मिळावा, यासाठी किशाभाऊ प्रयत्नशील असत. विद्यार्थ्यांबरोबर एक संध्याकाळ मी घालवावी, त्यांच्याशी संभाषण, प्रश्नोत्तररूपी संवाद व्हावा यासाठी ते आग्रह धरीत. किशाभाऊंना नाही म्हणणे मला शक्य होत नसे. त्यांनी सांगितलेली कामे मी आनंदाने प्रयत्नपूर्वक करीत असे. शेवटी हे सर्व ते अडचणीतील विद्यार्थ्यांसाठी करीत असत. त्यात जात, धर्म ही बाब नसे.

दुसऱ्याचे दुःख जाणावे । ऐकोनी तरी वाटोनी घ्यावे । बरे वाईट सोसावे । समुदायाचे ॥ समर्थ रामदास

'स्व'-रूपवर्धिनीच्या मुलांच्या टीव्ही, रेडिओवरील मुलाखती फारच प्रभावी ठरल्या. विद्यार्थ्यांचे विचार, समजूतदारपणा, प्रगल्भता तोंडात बोट घालावे इतकी वरच्या दर्जाची होती. घडवणूक केल्याने काय होऊ शकते याचे ते उत्तम उदाहरण होते. धुळीत पडलेले अनेक हिरे शोधून त्यांना पैलू पाडण्याचे काम किशाभाऊंनी स्वतः आणि आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने केले. अशा गोष्टींमुळेही मी किशाभाऊंच्या'स्व'-रूपवर्धिनीच्या जवळ गेलो तो कायमचाच.

अच्युतराव आपटे, किशाभाऊ या लोकांचा सहवास मला जवळून मिळाला हे मी माझे भाग्यच समजतो. त्यांच्यासारखे अनेक कार्यकर्ते पुण्याला लाभले, हे माझ्या मते पुण्याचे भाग्यच आहे. या मातीची काय जादू आहे हे माहीत नाही; पण इतक्या टोकाची निरलस, प्रामाणिक, पूर्णपणे वाहून घेतलेली मंडळी महाराष्ट्रात - प्रामुख्याने पुण्यात निर्माण झाली. याचमुळे अनेक कार्यक्षेत्रातील संस्था निर्माण झाल्या, विस्तारल्या. कार्यकर्त्यांची फळी या लोकांभोवती जमा झाली. परंपरा निर्माण झाल्या. याचे निर्विवाद श्रेय या सज्जनांना जाते. आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, या लोकांचा प्रचंड आशावाद, त्यांच्या चेहऱ्यावरील हसू कधी मावळले नाही, तर यांना मी कधीच त्रागा केलेले पाहिले नाही.

विचारमंथन, प्रयत्नवाद यांच्या जोरावर अडचणींचा सामना ते करीत असत. अडचण आहे ना, मग ती कशी, कोणाकडून सोडवून घ्यायची हाच विचार अखंडपणे तो सुटेपर्यंत अशा व्यक्तींमध्ये दिसत असे. माझे ते एक शिक्षणच होते. माझ्या आयुष्यातील कोणत्याही प्रकारची तक्रार सांगत बसणे हे मलाही अवघड झाले.

अखेरच्या काळात किशाभाऊंनी आपली जी काही स्थावर होती तीही 'स्व'-रूपवर्धिनीला देऊन टाकली. तन, मन, धन अर्पण केलेला तो एक तपस्वी होता. त्यांच्या त्यागाची संस्काराची परंपरा चालू राहावी, यातून अनेक व्यक्ती, संस्था निर्माण व्हाव्यात, हीच किशाभाऊंना आदरांजली होऊ शकते.

**चैतन्यदीप पुरस्कार**

'स्व'-रुपवर्धिनीचे संस्थापक श्री. किशाभाऊ पटवर्धन यांचा त्यांच्या शिक्षणक्षेत्रातील योगदानाबद्दल रोटरी क्लब-पुणे पर्वती, यांच्यातर्फे चैतन्यदीप पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मानपत्र व रोख रुपये दहा हजार असे या पुरस्काराचे स्वरूप होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे हा कार्यक्रम श्री. किशाभाऊ पटवर्धन सरांच्या घरीच झाला. रोटरी क्लब, पुणे - पर्वती, यांचे सर्व पदाधिकारी सहकुटुंब या कार्यक्रमाला उपस्थित होते. पैसा व प्रसिध्दी या दोन कारणांमुळे अनेक सामाजिक संस्थांमध्ये समस्या उद्‌भवतात, याकडे लक्ष वेधत श्री. पटवर्धन सरांनी वर्धिनीच्या कामाचे मोल, कामातील उपलब्धी सर्वांसमोर मोजक्या शब्दात प्रभावीपणे मांडली. या पुरस्कार प्रदानाचा जाहीर कार्यक्रम सोमवार दिनांक १४ जून रोजी हॉटेल सारसच्या सभागृहात झाला. श्री. ज्ञानेश पुरंदरे, श्री. जयंत कवठेकर, श्री. संजय तांबट, श्रीमती पुष्पाताई नडे व श्री. सुनील कुलकर्णी यांनी वर्धिनीच्या कामाचा परिचय उपस्थितांना करून दिला. सकाळचे संपादक श्री. अनंतराव दीक्षित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

दुसऱ्याच्या दुःखे दुःख व्हावे । परसंतोषे सुखी व्हावे । प्राणिमात्रास मेळवुनी घ्यावे । बऱ्या शब्दे ॥ स्वामी रामदास

# सेवाकार्याचा निर्मळ झरा किशाभाऊ

-गिरीश प्रभुणे - भटके-विमुक्त प्रतिष्ठान, महाराष्ट्र

*सुरूवातीला दाद न देणारे किशाभाऊ. हळूहळू मला समजत गेले. रोज त्यांचा दूरभाष येऊ लागला. नावं, दूरध्वनी क्रमांक, पत्ते देऊ लागले. 'मी यांच्याशी बोललोय. सुरूवातीला आपण जाऊ.' असं म्हणून ते मला घेऊन जाऊ लागले, मुंबई अक्षरशः त्यांना तोंडपाठ होती. डायरेक्टर, कंपन्यांचे मालक, मोठमोठ्या पेढ्यांचे शेटजी, अनेक समाजसेवक, व्यापारी. सर्व ठिकाणी ते मला घेऊन जाऊ लागले.*

किशाभाऊ .......

आणि

स्वरूपवर्धिनी...

किशाभाऊ आणि भटके-विमुक्त ....

एक नैसर्गिक नातं निर्माण झालं होतं. काही प्रसंग मनावर कायमचे कोरले गेलेत.

मुंबईत नवयुग निवासमध्ये त्यावेळी किशाभाऊ उतरत असत. डॉ. माधवराव परळकर त्यांच्या शैलीत विचारत.

"काय रे. तू 'स्व'-रूपवर्धिनीत गेलायस ....?

"नाही ....!" मला ही संस्था ऐकूनच माहीत होती.

"हेच. तू पक्का पुणेकर दिसतोसं. यांना ओळखतोस...?

मी मूकच राहिलो. मी यांना इथं पाहिलं होतं. भल्या पहाटे सर्वांच्या आधी उठून सर्व उरकून योगासनं करून थोडीशी ध्यानधारणा करून ते दूरध्वनीदर्शिका घेऊन दूरध्वनीजवळ बसत आणि मग जो त्यांचा मुक्त संवाद चाले, ऐकतच रहावं ! दहा-पंधरा दूरध्वनी झाल्यावर तिथल्या वहीत त्यांची नोंद करणार आणि लगेच त्याचे पैसे देऊन टाकणार आणि झटपट बाहेर पडणार. फार पाल्हाळ न लावणारं बोलणं. वागणं रोकडं, स्पष्टवक्तेपणाचं. पण त्या सगळ्याला एक वेगळाच आपुलकीचा ओलावा. अगदी आतून आलेला. हा ओलावा समाजविषयीचा. समाजाच्या आत्मियतेतून आलेला.

त्याच दिवशी मी त्यांचा परिचय करून घेतला. पण जेवढ्यास तेवढं बोलून जुजबी चौकशी करून ते निघाले. आणि वळून म्हणाले, "काय म्हणालात तुमचं काम... नाव... प्रभुणे नाही का....? एकदा सवडीनं या की 'स्व'-रूपवर्धिनीत. आम्हाला तुमचं काम काय ते नाही समजलं. पण या मग बोलू सविस्तर."

पुढे माझ्या भेटी होऊ लागल्या. मी जाऊ लागलो. एक दिवस ते मोतीबागेत त्यांच्या रिक्षानं आले होते.

म्हणाले, "चला येता ? कॉफी घेऊ. काही काम असलं तरी राहू द्या थोडं बाजूला..."

मी चिंतेत होतोच. माझं कोणी ऐकूनच घेत नव्हतं. अनेक बैठका झाल्या. निवेदनं झाली. पण प्रश्नाला उत्तर सापडत नव्हतं. तसं पाहिलं तर संघपद्धतीनं ते व्यवस्थित सुरू होतं. प्रत्येक बैठकीत माझं 'पारधी'

मावळल्याने होतो कारे अस्त भास्कराचा?

समाजावरील अत्याचारांच्या संबंधी बोलणं. दोन-चार मिनिटांचं होत होतं. त्याचा योग्य तो परिणाम होत होता. पण समस्या आणि त्यावर होणारी उपाययोजना यांचा मेळ लागत नव्हता. त्यात यासाठी लागणारा पैसा उपलब्ध होत नव्हता. त्यातच किल्लारीचा भूकंप झालेला. मदतीचा महापूर किल्लारीकडे लागलेला. कार्यकर्त्यांची रीघ लागलेली; पण पारधी, भटके-विमुक्तांच्या या प्रश्नांकडे पहायला कुणालाच सवड नव्हती. अशात एक बैठक सोलापूरला शिवस्मारकात झाली. त्या बैठकीतसुद्धा काहीच निष्पन्न झालं नाही.

एक ज्येष्ठ कार्यकर्ते समारोपात म्हणाले होते.

''अगदी आभाळ फाटल्यासारखं झालेय. एकीकडे रोज महिलांवर अत्याचार होतायत. गोळीबारात पारधी बांधवांची हत्या होतेय. समस्या गंभीर आहे पण हे काम एकदम होणारं नाही. हळूहळूच होणार. आपण मांडत राहिलं पाहिजे. होईल ती मदत करायला हवी.''

पण काहीच योग्य तो मार्ग निघाला नव्हता. मी, मधुसूदन व्हटकर, महादेवराव गायकवाड या बैठकीनंतर निराशच झालो होतो. अशा अवस्थेत मी पुण्यात मोतीबागेत आलो होतो. आणि किशाभाऊ म्हणत होते,

''चला कॉफी घेऊ या...''

खरं तर मी चिडलोच होतो. त्यांच्यावरही. ''यांना कॉफी कशी सूचतेय... इकडे मुलं यमगरवाडीत उपाशी आहेत... पोलिसांचे अत्याचार वाढलेत.''

आबा अभ्यंकर, किशाभाऊ, असे आम्ही कॉफी घ्यायला निघालो, 'गंधर्व'ला. तिथं आणखी काहीजण आधीच आले होते. मी त्या दिवशी त्यांच्या गप्पांमध्ये रमू शकलो नाही. पण किशाभाऊंनी माझा सर्वांशी परिचय करून दिला. ''उद्या शनिवार. आपण या गिरीशचं एकणार आहोत, पारधी समाजातल्या संघकामाविषयी.

दुसऱ्या दिवशी सकाळी सात वाजता चं.प. भिशीकर यांच्याकडे मी आबांच्या बरोबर वेळेवर पोहोचलो. बापूसाहेब भिशीकर यांच्याकडे एकेकजण दोन-चार मिनिटातच जमा झाले. डॉ. पुणतांबेकर, शामराव आपटे, कानिटकर, आळवणी, अप्पासाहेब वज्रम आणखी दोघं-चौघं, प्रत्येकजण आपापल्या क्षेत्रातले अनुभवी. त्यांच्या मोजक्या हास्यविनोदात मी अंग चोरून बसलो होतो. बापूसाहेब आणि दादा पुणतांबेकर आणि आबा यांनाच मी ओळखत होतो. कॉफीपान झाल्यावर 'हं. गिरीश, काय आता सुरू आहे? समन्वयच्या बैठकीत एकलं मी. पण फारसं कळलं नाही. सोलापूरकडे काहीतरी सुरू आहे नाही का...? बापूसाहेब म्हणाले.

मी थोडं थांबून बोलायला लागलो. मी जे बोललो त्यामध्ये त्रास, उद्वेग जास्त होता. वैताग अधिक होता. अखेर मी म्हणालो,

''अशा स्थितीत कोणाचीच मदत नाही. काम कसं करणार? मला आता इथून परत जायचं धाडस नाही तुळजापूर-यमगरवाडीला.''

सर्वजण पारधी, त्यांच्यावरचे अत्याचार, त्या विषयीची समाजातील अनास्था, संघ कार्यकर्त्यांची या कामाविषयीची हळहळू वाढत जाणारी जाण, हे सर्व ऐकून सर्वजण गंभीर झाले.

त्याच बैठकीत प्रत्येकानं पाचशे हजार रूपये गोळा केले. माझ्याकडे दिले. शिवाय लगेचच एक भेट

ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥

यमगरवाडीला द्यायची ठरले.

किशाभाऊंनी मला परतताना अनेक सूचना केल्या. "या सगळ्यांना तुम्ही पावत्या द्यायला हव्यात; लगेच. आभाराची पत्रं हवीत. शिवाय हे त्वरित हवं. गिरीश ! एक लक्षात ठेवं ! तीन गोष्टींना उशीर केला तर उपयोग नसतो. त्या त्वरित कराव्यात. एक, एखाद्यानं सहकार्य, मदत केली तर आभार, एखाद्यानं चांगलं काम केलं असेल तर त्यांच अभिनंदन त्वरित करावं आणि दुःखद घटनेनंतरच्या सांत्वनाला उशीर करू नये. एवढं केलं तर सर्व कामात तुम्हाला कोणतीच अडचण येणार नाही. मित्रपरिवार वाढेल."

मी या सर्व कृतीनं भारावून गेलो होतो. साडेसात हजार रूपये जमले होते. माझी निराशा कुठच्या कुठे गेली होती. सकाळी मी संतापून बोलत होतो. गेले चार दिवस मी कुणाशीच धड सरळ बोललो नव्हतो. पण या घटनेनं मला अंतर्मुख केलं होतं.

सुरुवातीला दाद न देणारे किशाभाऊ, हळूहळू मला समजत गेले. रोज त्यांचा दूरभाष येऊ लागला. नावं, दूरध्वनी क्रमांक, पत्ते देऊ लागले. 'मी यांच्याशी बोललोय. सुरुवातीला अपण जाऊ'. असं म्हणून ते मला घेऊन जाऊ लागले. मुंबई अक्षरशः त्यांना तोंडपाठ होती. डायरेक्टर, कंपन्यांचे मालक, मोठमोठ्या पेढ्यांचे शेटजी, अनेक समाजसेवक, व्यापारी, सर्व ठिकाणी ते मला घेऊन जाऊ लागले.

'स्व'-रूपवर्धिनीत सर्वांना एकत्र करून यमगरवाडीचा विषय त्यांनी मांडायला लावला. बघता बघता. 'यमगरवाडी' प्रश्नाभोवती एक आधारकवच उभं राहिलं. 'स्व'-रूपवर्धिनीच्या युवक-युवती यमगरवाडीला येऊ लागले. शिबिरं होऊ लागली. परीक्षांच्या काळात अभ्यास घेण्याकरिता येऊ लागले. निधी, धान्य, कपडे, भांडी, कार्यकर्ते असा ओघ यमगरवाडीकडे सुरू झाला.

यमगरवाडी माहितीत्रक नव्हते. त्याचा मजकूर आटोपशीर; शिरीष पटवर्धनांनी तयार केला. पहिलं पत्रक छापून इंग्रजी-मराठी तयार करून दिलं. वर्धिनीत एक टेबल-खुर्ची या कामासाठी उपलब्ध करून दिली. स्वतंत्र फाईल ठेवण्यात आली.

येणाऱ्या-जाणाऱ्याला माझा, यमगरवाडीच्या कामाचा परिचय करून देऊलागले. "वर्धिनीला भरपूर दिलंयत तुम्ही. आता यमगरवाडीला द्या."

कोणतीही बरी-वाईट घटना घडो. किशाभाऊ लगेचच सर्वांना एकत्र करून सर्वांपुढे मांडायला सांगत. त्याचा परिणाम चांगलाच होत असे.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. सकाळीच त्यांचा दूरभाष आला.

"अरे गिरीश, त्या पारध्यांच्या नादात अलीकडे तू आम्हाला विसरू लागलायस. आज एका भल्या माणसाला भेटायला जाणार आहे. अगदी पाचच मिनिटांत त्यांना सर्व सांगायचंस.. ते जर तुझ्या त्या यमगरवाडीला येऊ शकले तर तुझ्या सर्वच समस्या सुटतील असं नाही, पण बघ कदाचित ...."

आणि डॉ. जगन्नाथ वाणींची भेट झाली. यातूनच 'मगर-सांगवी' च्या प्रथमवसनास सुरुवात झाली.

नागपूरच्या पारधी धर्मांतराचे प्रकरण असेच. तिकडून आल्यावर त्यांनी मला बोलावून 'स्व'-रूपवर्धिनीतल्या सर्वांसमोर ते मांडायला

रिकामा जाऊ नेदि क्षण ।

सांगितलं. तेवढ्यावर न थांबता संजय तांबट यांना एका युवक-युवतींच्या तुकडीसह तिकडे पाठवलं.

माझी धावपळ ते पहात असत. अधूनमधून ते मला घरी बोलावत. त्या दिवशी दिवसभर सर्व कार्यक्रम रद्द करून त्यांच्याबरोबर जावे लागे. मग ते अनेकांच्या भेटी घालून देत. मला सर्व ठिकाणी यमगरवाडीचा अहवाल, ठळक घटना सांगायला लावीत. अर्ध्या कप कॉफीत दहा-वीस हजार रुपयांचे धनादेश मिळवून देत.

एक दिवस असेच ते मुंबईला जाणार होते. मलाही बोलावून घेतलं. तिथले प्राचार्य डॉ. पाटणकर त्यांच्या परिचयातले. ''गिरीश, हा माणूस अत्यंत महत्वाचा. तुझ्या विषयातला बाप आहे. उद्योग प्रशिक्षण, सर्व समस्या मिटून जातील. पण अगदी कमी बोलणारा आहे. तू त्यांना विषय सविस्तर पण नेमकेपणानं सांग.''

श्रमिक विद्यापीठातले सर्व कोर्सेस त्यांनी दाखविले. ज्या अगत्यानं डॉ. पाटणकर ते दाखवीत होते, त्यावरून किशाभाऊंचा खूप जुना परिचय असावा. त्यांनी सर्व मदत करण्याची तयारी दर्शवून म्हटले, ''एकदा किशाभाऊंनी करा सांगितलं, मग आता चर्चा नाही. मी आता तुमचा आहे. पण माझा तुम्हाला काय उपयोग होईल मला माहीत नाही.''

पुढे डॉ. पाटणकरांनी 'श्रमिक' अचानक सोडलं. पण आपला शब्द पाळला. यमगरवाडीसाठी त्यांनी निधी गोळा केला, अनेकांकडे जावून. डॉ. पाटणकर यांचे 'स्व'-रूपवर्धिनीत येणं-जाणं वाढलं. त्यांचे इंग्रजी शिकविण्याचे वर्ग. सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना त्या वर्गाला आग्रहानं बोलावणं. माझ्या मागे लागून, किशाभाऊंनी मला त्या वर्गाला येणं भाग पाडलं. सामाजिक काम करताना कार्यकर्त्यांनी परिपूर्ण व्हावं यासाठी ते प्रयत्नशील असत. ''इंग्रजांचा द्वेष ठीक आहे, पण इंग्रजीचा कशाला? ती भाषा गिरीश यायला हवी. तिला ओठात ठेवा. मानगुटीवर नको.'' ते म्हणत.

किशाभाऊंचा उत्साह त्यांच्या वयागणिक वाढणारा होता त्यांनी मला अपरंपार स्नेह दिला. आमच्या वयातलं अंतर पावशतकापेक्षा अधिक, पण ते मोठे कधीच वाटले नाहीत. अगदी बरोबरीच्या नात्यानं, मित्रापेक्षाही अधिक जवळकीनं ते बोलतं, वागत, सल्ला देत. प्रसंगी कठोर होत.

पावती पाठवली न गेल्यास ते मला बोलावून घेत. समोर बसवून पावती लिहायला लावत असत. आभाराचं पत्र लिहायला सांगत. ते सर्व पाकिटात घालून कुणाला तरी त्वरित पोस्टात टाकायला लावत. माझं भडकणं, समस्यांना जावून भिडणं, त्यामुळे हे सर्व पावत्या पाठवणं, पत्र पाठवणं वेळेवर होत नसे. मला ते म्हणत, ''गिरीश, हे तुझं बेचाळीस जातींचं काम काय बेचाळीस प्रकल्प करून थांबणार का? दोन-चार असे प्रकल्प कर की ज्याचा सर्वांना उपयोग होईल. आणि तू कुठवर करणार? तुला जे वाटतंय ते पाहणारा पुढे कोण? त्यासाठी कार्यकर्ता घडविणारं एक केंद्र कर. यमगरवाडी नुसती शाळा नकोस करू. कार्यकर्त्यांचं निर्मिती केंद्र होऊ दे. सेवेतून सेवेकरी तयार झाले पाहिजेत. त्यातून तयार होऊन पुढे चालविणारे आले पाहिजेत. ही बाहेरची माणसं फार काळ नाही चालणार.

अशाच एका महिला अत्याचार घटनेनंतर मी केलेली धावपळ त्यांना कळली. ते अस्वस्थ झाले. ते माझ्यावर खूप संतापले. मी त्यांना एवढं संतापलेलं कधीच पाहिलं नव्हतं. ''तुझा आगीचा बंब होतोय.

तीन गोष्टी देत रहा. मान, दान, ज्ञान. हीच सुखाची, समाधानाची त्रिसुत्री.

तुझ्या भावना बरोबर आहेत. तू हे किती करणार? त्या यमगरवाडीकडे तुझं दुर्लक्ष होतय. आज 'कोठेवाडी' उद्या आणखी काही. 'यमगरवाडी' - 'मगरसांगवी' च्यापुढे तू जाऊ नको. कार्यकर्त्यांनी करावं. आपण जाणीव जागृतीचं केंद्र उभ करावं, कार्यकर्ते उभे रहावेत ते त्या त्या घटकातले. मला हे तुझं मान्य नाही. एकाची नीट व्यवस्था लागत नाही. त्यासाठी लागणारा पैसा उभा रहात नाही. ज्यांनी लक्ष द्यायला हवं ते देत नाहीत. आणि जे तूच करायला हवंय ते तूच करायला हवंस. उद्या हे सगळं बंद पडेल. ते चालणार नाही. हे उठसूठ पेपर वाचून घटनेच्या मागे पळणं आता बंद कर.''

किशाभाऊ बोलले ते खरं होत. पण मला ते त्यावेळी पटलं नाही. मी त्या क्षणी खूप संतापलो. पुढे मी काही दिवस त्यांच्याकडे गेलो नाही. त्यांचा दूरध्वनी माझा पाठलाग करीत होता. एकदा आबा अभ्यंकरांनी मला न सांगताच त्यांच्या घराकडे स्कुटर वळवली.


''वा... वा... आबा. आज तू खरं काम केलसं. ये गिरीश!'' मग त्यांनी स्वतः दूध बनवलं. बिस्कीट समोर ठेवली. सफरचंद कापून ठेवलं आणि म्हणाले, ''खूप दिवसांचा उपाशी आहे मी, काही सांग की यमगरवाडीचं. काय म्हणतात मुलं? आणि हो, तुला वेळ आहे ना आज .....''

मग त्यांनी मधला काळ पुसून टाकला. भराभर अनेकांना दूरध्वनी केले. पुन्हा त्यांचा मायेचा हात माझ्या खांद्यावर पडला. काही वाचलेलं त्यांनी सांगितलं. त्यांच्या बोलण्यात 'स्व'-रूपवर्धिनींच्या मुला-मुलींचं कौतुक भरभरून येत असे. कुणाचं कौतुक ते हातचं राखून 'पुणेरी' पद्धतीनं करीत नसतं. माझ्यासाठी त्यांनी अनेकजणांचा वाईटपणा स्वीकारला. हे सर्व त्यांनी का केलं? किशाभाऊंनी आकड्यातच सांगायचं झालं तर वीस-पंचवीस लाख रुपये यमगरवाडी विषयाला मिळवून दिले आणि लाखमोलाची माणसं जोडून दिली. पुष्पाताई-संजय-ज्ञानेशसारखे असंख्य कार्यकर्ते जोडून दिले. हे सर्व करत असताना कशाचीही अपेक्षा धरली नाही. स्वतःच्या नावाची नाही. आभाराचीही नाही. अपेक्षा एकच. चिंता एकच. संघाची. हिंदुत्वाची. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे हिंदुसमाजाच्या हिताचा विचार असे.

अर्धा एक कप कॉफी. पण त्यातून भटके-विमुक्तांच्या कामाला आकार आला. मोठ्या गप्पा नाहीत. आश्वासनं नाहीत. जो जोडायचा तो कायमचा आपला करून सोडायचा. किशाभाऊ गेले. मोठी पोकळी निर्माण झाली.

...... हे नक्कीच. पण असंख्य युवकांच्या मनात मातृभूच्या सेवेचे अंकूर फुलवून ते गेले. खांद्यावर हलकेच पडणारा त्यांचा आश्वासक हात जरी आता नसला तरी आधाराचे अनेक हात ते जोडून गेलेत.

(साप्ताहिक विवेकच्या सौजन्याने पुनर्मुद्रित)



तिरस्कारामुळे झालेली जखम स्मितामुळे भरून निघते - शेक्स्पीअर

## सीमेवरील सैनिकांच्या सहवासात



प्राणांची बाजी लावून देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या सहवासात काही तास रहाण्याची संधी वर्धिनीच्या वर्धक-वर्धिका व युवक-युवती कार्यकर्त्यांना यावर्षी प्राप्त झाली.

'स्व'-रूपवर्धिनी, जन्मदा प्रतिष्ठान या दोघांनी मिळून विविध पुण्यात मुक्कामी असलेल्या सैनिकांसाठी 'एलओसी कारगिल' या चित्रपटाचा एक खेळ आयोजित केला होता. शनिवार दि. १० जानेवारी रोजी पुण्यात नव्याने सुरू झालेल्या 'ई-स्क्वेअर' या चित्रपटगृहात हा खेळ आयोजित केला होता. या खेळाचे वैशिष्ट्य म्हणजे या चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. जे. पी. दत्ता, या चित्रपटातील काही अभिनेते या खेळासाठी मुद्दाम उपस्थित होते. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे कारगिल युद्धात अतुलनीय पराक्रम गाजवलेल्या गुरखा रेजिमेंट या तुकडीचे वीरचक्राने सन्मानित झालेले कर्नल ललितराय व त्यांच्या बरोबर प्रत्यक्ष लढलेले या रेजिमेंटमधील काही सैनिक या खेळाला विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. आलेल्या सर्व सैनिक व अधिकाऱ्यांचे वर्धिनीच्या वर्धिकांनी कुंकूम तिलक लावून स्वागत केले. तसेच सैन्यदलाच्या घोषानेही त्यांचे स्वागत केले. या चित्रपटगृहाच्या बाहेर काही बंकर्स उभे केले होते. विमानभेदी तोफगाड्या उभ्या केल्या होत्या. एकूण वातावरण युद्धभूमीसारखे निर्माण केले होते. या वातावरणनिर्मितीमुळे या चित्रपटगृहात आलेल्या सर्वांना एक आकर्षण निर्माण झाले होते. पाकिस्तान विरूद्धच्या या युद्धात जप्त केलेल्या अनेक वस्तूंचे प्रदर्शन चित्रपटगृहात सर्वांसाठी मांडले होते. कारगिल युद्धात पराक्रम गाजवलेले कर्नल ललितराय व त्यांच्या गुरखा रेजिमेंटमधील काही सैनिकांचा तसेच या युद्धाच्या पार्श्वभूमीवर तयार केलेल्या एलओसी कारगिल या चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. जे. पी. दत्ता, अभिनेते सुदेश बेरी, विक्रम सलुजा यासारख्या उपस्थितांचे कौतुक करण्यासाठी सदर्न कमांडचे प्रमुख लेफ्ट. जनरल श्री. सतीश सातपुते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. ❋ ❋ ❋

## तुम्हारी कोखसे जनम लेने, माँ मै फिरसे आऊँगा ।

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त नेताजी सुभाषचंद्र जयंतीच्या दिवशी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन वर्धिनीने केले होते. कारगिल युद्धातील पराक्रमामुळे वीरचक्राने सन्मानित कर्नल ललितराय यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम. महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी वर्धिनीच्या वतीने ठरवण्यात आला होता. आबासाहेब गरवारे महाविद्यालय व जन्मदा प्रतिष्ठान हे या कार्यक्रमाचे सहसंयोजक होते.

मनाला कितीही धावू द्या. जिभेला मात्र आवर घाला.

या कार्यक्रमाला अठराशे महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. श्रीमती जोग यांनी रचलेला कारगिल युद्धावरील पोवाडा मॉडर्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केला. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील एक विद्यार्थी श्री. उमेश खंडेलवाल यांनी 'तुम्हारी कोखसे जनम लेने, माँ मै फिरसे आऊँगा' ही कारगिल युद्धावरील कविता सादर करून उपस्थितांना हेलावून टाकले. कर्नल ललितराय यांच्या पत्नी सौ. संजु ललितराय याही या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. सैनिकांच्या आणि सैन्यअधिकाऱ्यांच्या कुटुंबियांच्या समाजाकडून काय अपेक्षा असतात याविषयीच्या नेमक्या भावना त्यांनी या प्रसंगी प्रकट केल्या. सौ अपर्णा केळकर यांनी सादर केलेल्या 'ऐ मेरे वतन के लोगो' या गीताने कार्यक्रमाचे वातावरण भारावून गेले. याच वातावरणात कर्नल ललितराय बोलायला उभे राहिले तेव्हा उपस्थितांनी टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

उपस्थितांचा हा नेमका मूड पकडून कर्नल ललितराय यांनी कारगिल युद्धाची पार्श्वभूमी, या युद्धातील सैनिकांचे अभिमान वाटावा असे अनेक प्रेरणादायी प्रसंग, सैनिकांची मनःस्थिती या विषयी आपले प्रत्यक्ष अनुभव सर्वांसमोर ठेवले. हे युद्ध किती अवघड होते याची कल्पना त्यांच्या बोलण्यातून तसे त्या संदर्भातील काही छायाचित्रे पाहून उपस्थितांना पाहून येत होती. देशवासियांकडून, विशेषतः तरूणांकडून सैनिकांच्या काय अपेक्षा आहेत या भावना त्यांनी थेट शब्दात व्यक्त केल्या. त्या अपेक्षांना मिळणारा घोषणांचा प्रतिसादही अतिशय उत्स्फूर्त असाच होता.

रात्रीचे दहा वाजून गेले तरी ना कोणी जागेवरून हालले, ना कर्नलसाहेब बोलायचे थांबले. रात्री साडेदहा वाजता संपूर्ण वंदेमातरम् गीताने या कार्यक्रमाची सांगता झाली. कर्नल ललितराय यांची सही मिळविण्यासाठी, त्यांच्या पाया पडून पराक्रमाला अभिवादन करण्यासाठी आणि मला सैन्यात जायचं आहे मला मार्गदर्शन कराल का? अशी विचारणा करण्यासाठी उपस्थित तरूणांनी त्यांना जवळपास एक तास गराडा घातला होता. अत्यंत भारावलेल्या मनःस्थितीत सर्वजण रात्री उशीरा कार्यक्रमाच्या ठिकाणातून बाहेर पडले.




कार्याध्यक्षांकडून स्वागत

❊ ❊ ❊

आत्तापर्यन्त आपण पुष्कळ रडलो; पुरे आता ते रडणे. आता स्वतःच्या पायावर उभे राहून मनुष्य बना. - स्वामी विवेकानंद

कर्नल ललितराव यांच्या व्याख्यानाच्या आधी आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील एक विद्यार्थी श्री. उमेश खंडेलवाल यांनी युद्धभूमीवरील सैनिकाची नेमकी मन:स्थिती वर्णन करणारी एक कविता सादर करून कार्यक्रमाचे वातावरणच भारून टाकले होते. ती कविता येथे देत आहोत.

## माँ मै फिर आऊँगा ।

क्षमा करना माँ, जो देरसे लिख रहा हूँ चिठ्ठी ।
पर क्या करूँ? खतरे में थी देश की आज मिट्टी ॥

लाडला तुम्हारा अभी हुआ है रण में घायल,
देख उसकी शूरता, खुद शत्रु भी हुआ है पागल ।
खेल खून की होली, आज मैं दिख रहा हूँ प्रलयंकर,
उसी रक्त से लिख रहा हूँ, ये पत्र अंतिम समझ कर।
तुम्हारी कसम थी माँ मैं ना एक इंच पीछे हटा हूँ,
माँ तुम्हे दिया था वचन, देख आज इंचो में कटा हूँ॥

कहना बापू से, पितृऋण, ना मैं भर पाया,
इच्छा थी उनकी, पर ना में चिताग्नी दे पाया ।
बचपनमें आसमाँ छुआ, कंधोपे उनके खड़े होकर,
आज अंतमेंभी चलना पडेगा, उनकेही कंधोपे सोकर ।
पर हाँ ! आशिष उनका जरूर रंग लाया है,
शत्रु की गोलियों को मैंने सीने पर ही खाया है ॥

कहना भाई से गोली जब बाहो में आ समायी,
उस वक्त मेरे भाई, तेरी ही याद मुझे आयी ।
अनुज विश्वास रखना, मैं ना थककर पडूँगा,
जबतक है साँस का चलना, देश की रक्षा करूँगा ।
अब तुम्हीं को सौपता हूँ, बहन का ध्यान रखना,
मैं रहूँ ना रहूँ सहीं, पर उसे मेरा प्यार देना ।
बोल देना रक्षाबन्धन का पर्व जब भी आयेगा,
भाई अंबर में नजर, आशीष देता आयेगा ॥

कहती थी ना माँ तुम, एक बहू तुम्हे लानी है,
शादी करने जा रहा हूँ, सामने दुल्हन मृत्यू की बैठी है ।
छा रहा है सामने मेरे, अब आँखोंके अंधेरा,
पर उसी में दिख रहा है मुझे अब नूतन सवेरा ।
यह ना सोचना माँ मैं, चिरनिद्रा लेने जाऊंगा,
तुम्हारी कोख से जन्म लेने, माँ मैं फिर से आऊँगा ॥

उमेश बाळकृष्ण खंडेलवाल
(आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे)

आज आपल्याला सर्व क्षेत्रात 'माणूस' निर्माण करणारे शिक्षण हवे आहे. - स्वामी विवेकानंद

# सामान्यातील असामान्यत्व

**(रविवार दि २१ मार्च २००४ रोजी वर्षारंभ उपासना कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय संपर्कप्रमुख हस्तिमलजी उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाचा वृत्तांत.)**

मोठ्या उद्देशपूर्तीसाठी छोटा स्वार्थ सोडावा. कुटुंबाच्या हिताचा विषय असेल, तेव्हा व्यक्तीच्या स्वार्थाला दूर ठेवावे. 'जनपदा'च्या हिताचा विषय असताना कुटुंबाचा त्याग करावा आणि देशहितासाठी 'जनपदा'चा त्याग करावा असे आपल्या देशाची परंपरा सांगते.

आपल्या देशाच्या मातीचा कण माथी लावल्यावर जाणवेल की, या मातीच्या कणाकणात पराक्रमी, त्यागी व्यक्तींची चरित्रे लपलेली आहेत. इतकी पराक्रमाची व त्यागाची मोठी परंपरा आपल्या देशाला लाभलेली आहे.

केवळ मोठी कर्तृत्त्ववान माणसंच त्याग, बलिदान करतात असं नाही; तर अगदी सामान्य माणसांनीही खूप मोठा त्याग व बलिदान केले आहे असं आपला इतिहास सांगतो. राजस्थानच्या इतिहासात डोकावलं, तर अशा किती तरी कहाण्या आपल्याला दिसतील.

पन्नादाईचं उदाहरण अत्यंत प्रेरणादायी आहे. पन्नादाई एक अत्यंत सामान्य महिला. राज परिवारातील बालांचं संगोपन करणारी एक सेविका. पण तिलाही समाजाचे भले कशात आहे, याची जाणीव होती. महाराजांच्या गादीवर आक्रमण करण्याच्या इराद्याने राजवाड्यात शिरलेल्या आक्रमकाला महाराजांचा वारस छोटा उदयसिंह हवा होता. आक्रमकाच्या हाती छोटा उदयसिंह सापडला तर त्याची हत्या होईलच; पण ते मेवाडचेही दुर्भाग्य ठरेल याची कल्पना असलेली पन्ना, उदयसिंहाच्या रक्षणासाठी जीवाचे रान करते. छोट्या उदयसिंहाला ती एका छोट्या टोपलीत लपवून त्याच्या राजशय्येवर आपल्या स्वतःच्या मुलाला झोपवते.

आक्रमक तिच्या देखत तिच्याच पोटच्या पोराची युवराज समजून हत्या करतो. आपल्याच मुलाची हत्या पन्नादायी अत्यंत कठोरपणे पहाते, पण मेवाडचे भाग्य सुरक्षित ठेवते.

जेव्हा समाजातील छोट्यातील छोट्या व्यक्तीलाही कर्तव्याचे भान असते आणि त्याच्या मनात मोठ्यात मोठा त्याग करण्याचा भाव जागा होतो, अशा समाजाचे भाग्य उज्ज्वलच असते.

'रुंदावत' हाडी राणीची कहाणी अशीच प्रेरणादायी आहे. एक सरदार विवाह करुन येतो. हातावरची मेंदीही सुकली नव्हती; इतक्यात सूचना मिळते की सैन्याला घेऊन प्रस्थान करावे. औरंगजेब

देशातील दरिद्रनारायणांची व श्रमजीवी विष्णूंची पूजा करा. - स्वामी रामतीर्थ

जबरदस्तीने एका युवतीशी विवाह करायला येतो आहे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठी या सरदाराला आज्ञा मिळते. असा आदेश मिळाल्याने हा सरदार युद्धासाठी सज्ज होऊन प्रासादाच्या बाहेर येतो. पण त्याचे मन मात्र घुटमळत असते, कालच विवाह करून आलेल्या आपल्या पत्नीत. तो सेवकाला तिच्याकडून तिची आठवण म्हणून निशाणी आणायला सांगतो. ही नववधूही 'क्षत्राणी'च असते. तिच्या लक्षात येते की युद्धभूमीवर चाललेल्या आपल्या पतीचे लक्ष आपल्यात गुंतून राहिले; तर तो युद्ध जिंकू शकणार नाही. निशाणी मागायला आलेल्या सेवकाच्या लक्षात यायच्या आत ही क्षत्राणी आपले शीर कापून त्याच्या हाती देते. सेवकाने आणलेली 'निशाणी' पाहून सरदार गडबडतो; पण त्याच्या अर्थ त्याला समजतो. आपल्या प्रिय पत्नीचे शीर गळ्यात अडकवून हा सरदार युद्ध भूमीवर पराक्रम गाजवतो. ही 'हाडीराणी' आपल्या त्यागाने, बलिदानाने इतिहासात अजरामर झाली आहे.

मेवाडवर संकट आले होते; राणा प्रतापांना जंगलाचा आश्रय घ्यावा लागला होता. परंतु प्रजेला प्रिय असलेल्या या राजाची, प्रजा योग्य प्रकारे रक्षण करीत होती. मेवाडला पुनः मुक्त करण्यासाठी स्वतःचे सर्वस्व समर्पण केलेल्या या राजाला जंगलामध्ये भामाशाह येऊन भेटतात. राणाजींना आपल्या परिवाराची सर्व संपत्ती अर्पण करतात व मेवाड स्वतंत्र करण्यासाठी या संपत्तीचा विनियोग करावा, अशी विनंती करतात. राज्याच्या, देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्व संपत्ती अर्पण करणारे 'भामाशाह' त्यागाचे प्रतीक बनले. अजरामर झाले.

औरंगजेबाने काबूल - कंदाहारची लढाई जिंकलेल्या जसवंतसिंहांना विष लावलेला पोषाख मानसन्मानाच्या नावाखाली पाठविला. जसवंतसिंह त्यात मृत झाले. त्यांना दोन राण्या होत्या. त्यातील एक गर्भवती होती. जसवंतसिंहांचा स्वामीभक्त सरदार दुर्गादास राठोडच्या ही गोष्ट लक्षात येते. जोधपूरचा वारस जिवंत ठेवायचा असेल, तर या राणीचे रक्षण केले पाहिजे, हे दुर्गादासच्या लक्षात येते व तो राणीचे आणि जोधपूरच्या वारसाचे रक्षण करतो. देशहितासाठी अशी निष्ठा असलेल्या या सरदाराला गादीवर बसलेल्या त्या वारसाकडूनच हद्दपारीची शिक्षा मिळते. दुर्गादासची निष्ठा जोधपूरच्या हिताशी निगडीत असल्याने हद्दपारीची शिक्षा भोगूनही राजाने जोधपूरच्या रक्षणासाठी हाक देताच वैयक्तिक अपमान विसरून दुर्गादास जोधपूरच्या रक्षणासाठी धावून येतो. देशहित महत्त्वाचे हा दुर्गादासचा संस्कार अनुकरणीय व वंदनीय आहे.

ठराविक वर्षांनी राजाने यज्ञ करायचा व यज्ञात आपली सर्व संपत्ती दान करून टाकायची अशी परंपरा आपल्याकडे होती. आपली सर्व संपत्ती दान केल्यानंतरही दारात आलेला याचक विन्मुख जाणार नाही याची काळजी राजा घेत असे.

कौत्स हा गरीब परिस्थितीतला विद्यार्थी गुरूगृही राहून शिक्षण पूर्ण करतो. आश्रम सोडताना गुरूंना गुरूदक्षिणा द्यावी, असे त्याला मनोमन वाटते. तो तशी इच्छा गुरूंजवळ प्रकट करतो. कौत्साची परिस्थिति माहिती असल्याने गुरू त्याला अशी आवश्यकता नसल्याचे समजावून सांगतात; पण त्याचा हट्ट पाहून त्याला अशक्य अशी चौदा लाख सुवर्ण मोहोरांची

> स्त्रिया, मुले आणि कामगारवर्ग यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे आम्हाला आधार देणाऱ्या वृक्षाच्या फांद्या तोडण्यासारखेच आहे. - स्वामी रामतीर्थ

मागणी करतात. गरीब कौत्स या मागणीच्या पूर्ततेसाठी याचक बनून रघुराजाच्या दारी येतो. यज्ञात सर्व संपत्ती दान केलेला रघुराजा कौत्साची इच्छा पूर्ण करण्यासाठी कुबेरावर स्वारी करायचे ठरवतो. रघुराजाचे आक्रमण कोणत्या हेतूने आहे, हे समजताच कुबेर स्वर्गातून सुवर्ण मोहोरांचा पाऊस रघुराजाच्या राज्यात पाडतो अशी कथा आपल्याकडे प्रसिद्ध आहे.

सर्वस्व समर्पण करण्याची आमच्याकडे परंपराच आहे. 'विश्वस्त' या संकल्पनेत ज्या संपत्तीची साधनांची जबाबदारी सोपवली आहे; ती आपली नाही, तर त्याचे रक्षण करणे ही विश्वस्त म्हणून आपली जबाबदारी आहे.

कर्तव्यपालनाची छोटी संधी म्हणजे आपले काम. अनेक समस्या देशासमोर, समाजासमोर आहेत. या समाजाची सेवा करणारे लोक आहेत; पण ही संख्या अधिक असण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवाने आमच्याकडे अशी धारणा आहे की, समाजाची सेवा करणे ही संन्याशाची जबाबदारी आहे.

वर्षप्रतिपदेच्या याच पवित्र दिवशी डॉ. हेगडेवार यांचा जन्म झाला. ते खऱ्या अर्थाने संन्यासी होते. शिक्षणाने वैद्यकीय पदवी धारण केलेले ते डॉक्टर होते. परंतु ना त्यांनी संसार केला, ना वैद्यकीय व्यवसाय करुन पैसे मिळवले. या ज्ञानाचाही उपयोग त्यांनी समाजसेवेसाठीच केला. संपूर्ण आयुष्य देशसेवेतच घालवले. संन्याशासारखे राहूनही संन्याशाचा वेश त्यांनी धारण केला नाही. सामान्य माणसांमध्ये सामान्य माणसांसारखेच राहिले. एकाने त्यांना विचारलेदेखील की, डॉक्टर आपले आचरण तर संन्यासी व्यक्तीसारखेच आहे; तर मग आपण तशी वस्त्रे का परिधान करीत नाही? डॉक्टरांनी उत्तर दिले की, सामान्य जीवन जगणारे वा गृहस्थी जीवन जगणारे देशसेवा करू शकत नाहीत, ती जबाबदारी संन्यासी व्यक्तींची आहे अशी आपल्या समाजात धारणा आहे. समाजाची ही चुकीची धारणा बदलण्यासाठीच मी असा रहातो, असा वेश परिधान करतो.

स्वामी विवेकानंदांनी भारतासंबंधी अत्यंत अभिमानाने गौरवाने परदेशामध्ये भाषणे दिली. परंतु देशस्थिती पाहून मात्र ते व्यथित व्हायचे. भारत परिक्रमेच्या निमित्ताने देशातील युवक-युवती, शिक्षक, धर्माचार्य, संन्यासी या सर्वांना त्यांनी प्रेरित केले. एका वादविवादाचे वेळी त्यांनी आपल्या गुरूबंधूंनाही सांगितले की, संन्याशाचा वेश हा समाजासाठी आहे. सामान्य माणसांच्या व्यथांनी ते कष्टी व्हायचे. श्रमिकांना आपल्या हातांनी त्यांनी खाऊ घातले असेही प्रसंग स्वामीजींच्या चरित्रात आढळतात. सामान्य माणसाची व्यथा पाहून जर मनात वेदना उत्पन्न होत नसतील, तर तो माणूस तरी कसा !

योगी अरविंदांच्या आई-वडिलांची इच्छा अशी होती की, त्यांचा अरविंद हा इंग्रजांपेक्षा वरचढ इंग्रज व्हावा. आपल्या देशातील लोकांची सावली सुद्धा त्यांच्यावर पडू नये. वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी अरविंदांना इंग्लंडला पाठवून दिले. श्री.अरविंद तेथे राहून काय फरक पडला? शेवटी माणसाची अंतःकरणातील प्रेरणाच व्यक्तीला घडवीत असते. आयसीएसची परीक्षा सोडून श्री.अरविंद भारतात आले. सुरुवातीला शिक्षक-अध्यापक-प्राध्यापक झाले.

...शुद्ध, पवित्र विचारांनी तुमचे मन भरू दे. मग तुमच्या विरूद्ध जाण्याची ताकद कोणाचीही नाही. हा प्रकृतीचा कायदा आहे. - स्वामी रामतीर्थ

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिले आणि पुढे तर दार्शनिक होऊन शेवटपर्यंत राहिले. श्री.अरविंदांचे स्मरण केले की श्री.माताजींचेही स्मरण होतेच. कोण होत्या या माताजी ? त्यांचे मूळ नाव 'मीरा'. त्या भारतीय नव्हत्या. फ्रेंच मध्ये 'मीरा' शब्दाचा अर्थ आहे समुद्र. फ्रान्समध्ये असतानाच त्यांना असे वाटत होते की, कोणी महापुरूष त्यांना दिशा दाखवितो आहे. त्या महापुरूषांच्या शोधात आपल्या पतीसह भारतात आल्या. श्री.अरविंदांना पाहिले आणि त्यांच्या लक्षात आले की, अनेक वर्षांपासून जो महापुरूष त्यांना दिशा दाखवितोय तेच हे गृहस्थ... हेच माझे कृष्ण आणि अक्षरशः मीरेच्या भक्तीने त्या आयुष्याच्या अखेरपर्यंत पाँडेचरीच्या आश्रमातच राहिल्या. येथील मातीत माताजींचा जन्म झाला नसला, तरी त्या या मातीतच सामावून गेल्या.

आपल्यासमोर अशी अनेक उदाहरणे आहेत. हे केवळ आणि केवळ आपल्यावर अवलंबून आहे की, या उदाहरणांवरून आपण काय बोध घेणार?

आपल्यापाशी सामर्थ्य हवे, मनात उत्साह हवा, बुद्धीत प्रखरता हवी, लोकांना एकत्र ठेवण्याची कला हवी, ग्रहणशक्ती हवी. या सगळ्यासाठी आपण सर्वजण श्रीपरमेश्वराची प्रार्थना करूयात.

**''आणि जागृत देवस्थानाजवळ, येणाऱ्या बिअर बारची परवानगी रद्द झाली.**

'स्व' रूपवर्धिनीच्या एका वर्धकाच्या जागरूक प्रयत्नांमधून व त्या भागातील नगरसेवक, आमदार, पुण्याचे पालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी यांच्या सक्रिय सहकार्यामुळे जंगली महाराज रोडवर जंगलीमहाराज मंदिराजवळ येऊ घातलेले बिअरबारचे संकट टळले.

जंगली महाराज रस्त्यावरील रेव्हेन्यू कॉलनीत एका हॉटेलचे रूपांतर बिअर बारमध्ये होणार असल्याची कुणकुण 'स्व'रूपवर्धिनीच्या वर्धकाला लागली. उद्घाटन चार दिवसांवर आल्यावर ही बातमी पोहोचली. या युवकाने त्या भागातील नागरिकांच्या सहाय्याने हा मुद्दा उचलून धरला व मंदिराच्या इतक्या जवळ व भरवस्तीतील बिअरबार येता येता थांबला.

*With Best Compliments From :*

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

**Plot No. 4, S. No. 17/1 – B, Kothrud Industrial Estate,**
**Kothrud, Pune - 411 038**
**Phone : 25431474, 25441124, 25464551**

जेथे बुद्धी हात टेकते, तेथे प्रेम आशा दाखवते. - स्वामी रामतीर्थ

## नजरांनी अजूनही त्या, प्रकाशच पाहिला नाही

कु. लता टिळेकर

वनवासी क्षेत्र अभ्यास दौऱ्यावर निघण्यापूर्वी ज्ञानप्रबोधिनीचे श्री. महेंद्र सेठिया यांची भेट घेतली होती. हा दौरा त्यांनी आधी केलेला असल्याने त्यांचे मार्गदर्शन मोलाचे होतेच; पण खूप सखोल आणि तपशीलातले होते.

दौऱ्याच्या आदल्या दिवशी सौ. बागेश्रीताईंनी आमच्या अभ्यासगटाची एक बैठक घेतली. आपण ज्या संस्थांना भेटी देणार आहोत, त्या संस्था कोणते काम करतात, त्यांची कार्यपद्धती कशी आहे, त्यांच्या कार्यक्षेत्रातला त्यांचा प्रभाव कसा आहे, तिथल्या कार्यकर्त्यांची ध्येयनिष्ठा कशा व कोणत्या आहेत असे प्रेरक विषय त्यांनी आमच्यासमोर ठेवले. या पूर्वतयारीमुळे आमच्या अभ्यासाला दिशा मिळाली होती.

**दि. २५ नोव्हेंबर, २००४**

एकूण १४ जण रात्री ठीक दहा वाजता वर्धिनीत जमलो. आम्ही ठाणे-जव्हार अभ्यासदौऱ्यावर निघालो होतो. दि. २५ ते २९ नोव्हेंबर २००४ हा प्रवासाचा कालावधी होता. मागच्या दौऱ्याच्या वेळचे सुखद अनुभव स्मरणात गर्दी करीत होते. वनवासींचे जीवन, त्यांच्या बरोबरचा स्वयंपाक, मोहोळ वृक्षाची बने, तारप्याचे सुरेल स्वर व त्यां स्वर-तलावरचे तारपा नृत्य... आणखी असे खूप काही स्मरत होते.

**दि.२६ नोव्हेंबर,२००४**

वेळ - पहाटेचे ५.४५, मूक बधीर शाळा, प्रगती प्रतिष्ठान, मुक्काम जव्हार. स्वागतास वर्धिनीचा वर्धक संजय राचेल्ली आणि प्रगती प्रतिष्ठानच्या सौ. सुनंदाताई पटवर्धन. संजय सर्वांच्याच परिचयाचा. सौ. सुनंदाताईं पटवर्धनांची मात्र बहुतेक जणांशी पहिलीच भेट. श्री. राजेन्द्र मुकणे यांना आमची व्यवस्था लावण्यास सांगून लगबगीने त्या पुढच्या कामाकरता निघून गेल्या. श्री. मुकणे आम्हाला ग्रामस्वराज्य समितीच्या श्री. रामकृष्ण लक्ष्मण दिग्रजकर यांच्याकडे घेऊन गेले.

### ※ ग्रामस्वराज्य समिती, जव्हार

कुपोषितांना अन्नदान, कर्जमुक्ती, व्यसनमुक्ती, नशाबंदी, सामूहिक विवाह, आरोग्यविषयक सेवा, व्यवसाय प्रशिक्षण, शेती प्रशिक्षण, एडस्‌संबंधी जनजागृती, वनवासी कला व संस्कृतीचे जतन आणि संवर्धन, विवाह समारंभात जनजागृतीवर मंगलाष्टकांची रचना अशा अनेक माध्यमांतून श्री. दिग्रजकरांचं वनवासींबद्दलच्या अत्यंत तळमळीनं, सर्वांना नतमस्तक करायला लावणारं काम चालतं. त्यांच्याबरोबरचा 'चहा' अविस्मरणीय ठरला. अत्यंत दिलखुलास आणि पारदर्शकही.

**वनवास हा सुखाचा**

श्री. दिग्रजकर मूळचे वैदर्भी. पण आता इथलेच. बाराव्या वर्षीपासून आदरणीय विनोबाजी भावे यांच्या शिकवणुकीनुसार जगण्याचा ध्यास घेतलेले. तेव्हापासून घर सोडून या 'वनवासात' सुखानं रमलेले. महात्मा गांधीजींच्याही तत्त्वज्ञानाने भारावलेले. आता सर्वोदय - ग्रामस्वराज्य' ही कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मनुष्य हा स्वतःच आपल्या नियतीचा धनी आहे. (मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः।)

ग्रामस्वराज्य केन्द्र, यशवंतनगर, विक्रमगड येथे शिवणवर्ग, विद्युत विभाग प्रशिक्षण, नैसर्गिक शेती प्रयोग अशी कामे चालतात. आठ-दहा किलो मीटरच्या परिसराला याचा लाभ होतो.

### ❊ प्रगती प्रतिष्ठानचे 'वारली चित्रकला केन्द्र'

एका विशिष्ट पद्धतीने केलेल्या या रंगकामात वनवासींचे संपूर्ण जीवन, परंपरा, जीवनशैली चित्रित केली आहे. विविध वस्तूंचा कल्पकतेनं वापर करून हे चित्रण केलं आहे. या कलादालनात 'वारली चित्रकला' अवगत असणाऱ्या जिल्हा-राज्य-राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्व कलावंतांची एकत्रित माहिती मिळते. १० रुपयांपासून ३००० रुपयांपर्यन्तच्या कलापूर्ण वस्तूही या दालनात ठेवलेल्या आहेत. ही कला जतन व्हावी म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले जाते. काही मूक-बधीर विद्यार्थ्यांचं चित्र काढणं, ती रंगवणं चालू होतं. त्यांचं काम इतक सुंदर होतं की, या बोलक्या चित्रांनी त्यांचं मूकबधीरपण कायमचं संपवून टाकलं होतं !

### ❊ केळीचा पाडा

भारतीय ॲग्रो इंडिया फाऊंडेशनच्या (BAIF) माध्यमातून येथे चालणाऱ्या कामामुळे पेरू, काजू, आंबा आणि अन्य शेती यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

शेजारच्या पाड्यावरील वनवासींच्या घराघरात गेलो. त्यांच्याशी गप्पा मारल्या. त्यांची घरे, त्यांचे राहणीमान, त्यांची बोलण्याची, वागण्याची पद्धती हे सारंच बहुतेक कार्यकर्त्यांसाठी नवीन होतं. आम्ही सारेच उत्सुकतेन त्यांच्याशी गप्पा मारीत होतो आणि मोठ्या नाविन्यानं त्यांचं निरीक्षणही करीत होतो.

नंतर आम्ही पोडाईच्या पाड्यात गेलो. तिथं सगळ्या छोट्यांना एकत्रित केलं. त्यांचे खेळ घेतले, गाणी घेतली. आता हळूहळू संधीप्रकाश ओसरू लागला. खरं तर संधीप्रकाश सगळीकडे सारखाच. पण आमचं शहरातलं आणि त्याचं पाड्यावरचं जीवन मात्र किती भिन्न ! का अशी भिन्नता ? खरं म्हणजे ते आमचे आहेत आणि आम्ही त्यांचे आहोत आणि आम्ही सारे याच भूमीचे पुत्र आहोत. ..... परत निघालो, अंधारून आलं होतं. पण त्या छोट्यांचे कुतुहलानं चमकणारे डोळे मात्र डोळ्यांसमोरून अजूनही हालत नव्हते.

### ❊ मूक बधीर शाळा, प्रगती प्रतिष्ठान, जव्हार

शाळा व वसतीगृह सुरू झालं. प्रथम खूप अडचणी आल्या. मुलांना दूर ठेवायची पालकांना भीती वाटायची आणि मुलांना आई-वडिलांची आठवण अस्वस्थ करायची. आता मात्र पन्नास मुलांचं वसतीगृह आहे आणि उत्तम शाळाही आहे.

**उत्साहाचा झरा**

सौ. सुनंदाताई पटवर्धनांच माहेर वाईचं. ग्रामीण वातावरणाचा पूर्ण अनुभव. पण सामाजिक कामाचा वारसा मात्र श्री. वसंतरावांशी विवाह झाल्यानंतर लाभला. त्यांच्यासह त्याही प्रगती प्रतिष्ठानच्या कामात आल्या. अगदी साधी रहाणी. सतत कामात स्वतःला बुडवून घेणाऱ्या आणि सतत उत्साहानं ओथंबलेल्या. आम्हा सर्वांना पाहून अतिशय आनंदित झालेल्या, चेहेऱ्यावर कामाच्या ताणाचा लवलेशही नसलेल्या. आणि मुख्य म्हणजे कर्तृत्वाच्या अहंकाराची झुळूकही न लागलेल्या.

स्वर्ग तुमच्या अंतर्यामीचे नंदनवन आहे. सुखधाम तेथेच आहे. - स्वामी रामतीर्थ

हे काम चालू असतानाच प्रतिष्ठानने जव्हार परिसरातील महिलाचं सर्वेक्षण केलं. अनारोग्य, अस्वच्छता, गरोदरपणी नीट काळजी न घेणं, बाळंतपणातल्या समस्या असे अनेक विषय समोर आले. मग १५-१५ जणींचे गट केले. त्यांना मुंबईत नेऊन सुईणीच्या कामात प्रशिक्षित केलं. त्यांना औषधं, कपडे, आवश्यक साधनसामुग्री याचा एक संच दिला. प्रयोग यशस्वी झाला. पण, अजूनही प्रगतीला खूप वाव आहे. या कामात काही अडथळेही आहेत. अजूनही मुलींची लहान वयातच लग्ने होतात. त्यामुळे लहान वयातच त्यांच्या मुलांचे जन्म. आईचे आणि मुलांचे आरोग्य धोक्यात येते. त्यातच संततीनियमनाचा विचारही नाही. दारिद्रयामुळे जन्माआधी आणि जन्मानंतर माता आणि बाळ दोघांचही कुपोषण.

प्रगती प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते आणि सौ. सुनंदाताई यांच्यासमोर असे प्रश्नांचे डोंगर उभे आहेत.

पुण्यातील गंगोत्री या संस्थेच्या साह्यानं वसतीगृहात बायोगॅस प्लांट सुरू झाला आहे.

रोटरी क्लबच्या साह्यानं शंभर पाड्यांवर ऊर्जा, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या विषयांना अनुसरून योजना सुरू झाल्या आहेत.

या सगळ्या कामांसाठी ताईंची या पाड्यावरून त्या पाड्यावर अशी झपाटल्यासारखी भ्रमंती सुरू असते. सोबत असणाऱ्यांवर त्यांच्या या झपाटलेपणाची छाप पडते. मग कामालाही गती येते.

ताईंचा या वयातला जोश आणि उमेद पाहून मनात विचार आला की खरंच तरूण कोण? त्या की आम्ही? उत्तर एकच होतं की, ताईंचा आदर्श आम्ही प्रत्येकानं ठेवला पाहिजे.

दि. २७ नोव्हेंबर, २००४

**※ मुक्त शाळा - ऐना**

सकाळी लवकर उठलो. आवरलं आणि ऐन्याकडे प्रस्थान मांडलं. साडेदहाला ऐना आलं. बालवाडीच्या प्रमुख ताईंनी आमचं स्वागत केलं. जवळच असलेल्या तीन पाड्यांवर शाळा पाहायला गेलो. तेथील शिक्षणपद्धतीत नैसर्गिक साधनांचा पुरेपूर वापर करून मुलांना शिकण्याचा आनंद दिला जातो. त्यांची छान छान गाणी ऐकली. त्यांचा चुणचुणीतपणा, स्वावलंबन खूप भावलं. 'मुक्त शाळा' हे नाव किती सार्थ आहे याची प्रचिती या विद्यार्थ्यांच्यात रमल्यानंतर आली.

**※ ग्राममंगलचं प्रशिक्षण केन्द्र**

तिथे 'वनभोजन' संस्थेचा माहितीपट पाहून तळासरीकडे प्रस्थान केलं.

'सूत्रकार नगर'. साधी अर्धी विजार व सदरा अशा वेषातील श्री. अंधेर गुरूजी भेटले. शैक्षणिक उपक्रमांबरोबर अन्य कामातही गुरूजी सक्रीय आहेत. धर्मांतरांसारख्या समस्येशीही त्यांचा सामना चालू आहे. वनवासींच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा फायदा काही मतलबी संस्था घेतात. गुरूजी शुद्धीकरणाचं कार्य जोमानं करतात. फसवल्या गेलेल्यांना परत हिंदू धर्मात आणतात. पाड्यापाड्यांवर गणेशोत्सव जोरात साजरा होतो. दीड दिवसांचाच उत्सव असतो; पण जोशात साजरा होतो.

गुरूजींचं निरीक्षण डोळस आहे. वनवासींच्या परंपरा, त्यांची संस्कृती काळाच्या ओघात पुसली जाऊ नये म्हणून ते प्रयत्नशील आहेत. 'आम्ही आदिवासी वारसं,''आदिवासींची करमणूक आणि मनोरंजन

प्राप्तीपेक्षा प्रयत्नांचा आनंद विशेष आहे. - विनोबाजी भावे

साहित्य,' 'अवतार परंपरा', 'वनौषधी' अशी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत.स्वामी विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव त्यांच्या मनावर आहे. त्यांचा निरोप घेतल्यावर सतत 'विकसित व्हावे. अर्पित होऊनि जावे' हे वर्धिनीचं ध्येयवाक्य डोळयांसमोर तरळत होतं.

**असाध्य ते साध्य करिता सायास**

अंधेर गुरूजी लहानपणापासून दोन्ही पायांनी अपंग. सात वर्षांचे असताना त्यांना एक प्रश्न पडला. आपले आजोबा लंगोटी लावलेले आणि इंग्रज अधिकारी पूर्ण पोषाखात. त्याच्या डोक्यावर छत्री धरण्याकरता धावायचे. त्यांच्याच घराच्या ओट्यावर बसून शहरी माणसे डबे खात आणि उरलेले अखेर अंधेर कुटुंबियांच्या हातावर टेकवत. वनवासी आणि इतर शहरी लोक यांच्यात इतकी तफावत का? हा तो पडलेला प्रश्न होता. उत्तर त्यांच्या आजोबांनी दिलं. शहरी लोकं शिकलेली आहेत आणि आपण नाही. गुरूजींनी शिकायची इच्छा व्यक्त केली. गुरूजींच्या वडिलांनी त्यांना आधी आपल्या पायांवर उभे रहायला शिक असे सांगितले.

गुरूजींनी वर्षभर पायावर उभं रहाण्याचा सराव केला. अपंगत्वावर मात केली. शाळेत प्रवेश घेतला. सातवी उत्तीर्ण झाले. प्रवेश मिळाला तेव्हा परीक्षेला केवळ १५ दिवस उरलेले. पुन्हा संघर्ष. यश मिळवलं. शिकत असतानाच आईचा मृत्यू. खूप अडचणी पण त्यावरही मात. स्वत: शिकल्यावर सूनवार इथे डोंगरी पाड्यावर वनवासींकरता शाळा सुरू केली.

### ❊ वनवासी विकास आश्रम, तळासरी

रात्री ८.३० वा पोचलो. जेवणानंतर श्री. विवेक वैद्य यांच्याशी बोलणे झाले. त्यांच्यावर विद्यार्थ्यांची पूर्ण जबाबदारी आहे. त्यांचा मुलांशी असलेला संबंध; अत्यंत अनौपचारिक, आपलेपणानं सुसंवाद साधणारा आणि कमालीचा पारदर्शी. शिवाय संघ संस्कारातून आलेली शिस्त, त्यामुळेच मुलांना आणि सर्वांना त्यांच्याबद्दल आदर वाटतो आणि थोडी आदरयुक्त भीतीही. आम्ही एका मोठ्या कुटुंबातच आलो आहोत, असं वाटत होतं. त्यांच्या बोलण्यातून या संस्थेचा इतिहास पुढे येत होता. १६ एप्रिल १९६७ (३७ वर्षांपूर्वी) गुढीपाडव्याला वनवासी विकास आश्रम या नावानं या परिवार कार्याचा मुहूर्त झाला. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. दामूअण्णा टोकेकर आणि राजकारणाच्या गजबजाटातून स्वत:ला निवृत्त करून घेतलेले माजी नगराध्यक्ष श्री. माधवराव काणे यांनी या कामाचा प्रारंभ केला.

प्रमुख समस्या होत्या, त्या देशविघातक हेतूनं आणि सक्तीन केलं जाणार धर्मांतर, अज्ञान, अनारोग्य आणि दारिद्र्य, यातना यांनी भरलेलं वनवासींचे जीवन. मिशनरी आणि हिंसक साम्यवादी यांच्याशी प्रारंभी संघर्षही झाले.

आज मुलांसाठी वसतीगृह, शाळा, नऊ ठिकाणी साप्ताहिक दवाखाने, रूग्णांसाठी सकस आहार, आरोग्य शिबिरं, नेत्रदान आणि नेत्र चिकित्सा, सुसज्ज व्यायामशाळा, भारतीय वंशाच्या गायींची गोशाळा, यंत्रशाळा, रोपवाटिका वनौषधी, गांडूळ व सेंद्रिय खत प्रकल्प असे अनेक प्रकल्प तळासरी केंद्रामार्फत चालतात. तसेच गणेशोत्सव, मकर संक्रांत, रक्षाबंधन, माजी विद्यार्थी संघाचा क्रीडा महोत्सव, कबड्डी स्पर्धा,

You never really understand a person until you consider things from his point of view.

माधव कथा कथन स्पर्धा, व्याख्यानं, सामुदायिक विवाह, महालक्ष्मी यात्रेत पाणपोई, पालकांकडून तांदूळदान असे अनेक उपक्रम चालतात.

...दीप निर्वाण झालं. पण मनात मात्र उजाडलेलं होतं!

दि. २८ नोव्हेंबर, २००४

रात्री जे ऐकलं होतं, ते सकाळी सगळं डोळ्यांनी भरभरून पाहिलं. सारे प्रकल्प पाहिले. सारा परिसर पाहिला. आदरणीय माधवराव काणे यांचं निवासस्थान पाहिलं; खऱ्या कार्यकर्त्याचं 'घर' पाहिलं, साधेपणा आणि साधूपणा यांचे जवळून दर्शन झालं. पुढचा प्रवास सुरू झाला.

मनोरमध्ये पोचलो तेव्हा १२.३० झाले होते. वाटेत एक मुलीचं वसतीगृह पाहिलं.

**※ शांतीसेवा केंद्र , मनोर**

श्रीमती रॉड्रीग्ज या वसतीगृहाचं काम पहातात. त्यांना चार सहकारी कार्यकर्त्यांचं साह्य आहे. तुलनेनं तळासरी वसतीगृह समोर आलं. तिथं एकटी दिपालीताईच सर्व पहाते. असं का? अर्थातच या प्रश्नाचं उत्तरही आपल्याकडेच आहे. आपली उदासीनता हेच सर्व समस्यांचं मूळ आहे. या वसतीगृहाच्या परिसरातील स्वच्छता, टापटीप आणि शांतता तिथल्या उत्तम व्यवस्थापनाची पावतीच होती. तिथल्या मुलींशी गप्पा मारल्या. त्यांची गाणी ऐकली. आणि 'शांती सेवा केंद्रात' आलो. फादर टोनी भेटले. ते वकील आहेत. पूर्णपणे या संस्थेचे काम बघतात. या केन्द्रात फक्त अल्प भूधारक आणि गरीब विद्यार्थ्यांनाच केवळ प्रवेश आहे. पाड्यांवर रात्रशाळा, डिसेंबर ते एप्रिल असे सहा महिने भोंगा शाळा, कृषि शिक्षण, उपसा जलसिंचन, सेन्द्रीय खत प्रकल्प, कायदेशीर मार्गदर्शन, रेशनकार्डे मिळवून देणे इ. कामं हे केन्द्र करते.

**※ रामकृष्ण मठ, सकवार**

मुंबई-अहमदाबादच्या हमरस्त्यावर हा मठ आहे. पण, आत मात्र आपण गजबजाटापासून पूर्ण दूर जातो. केवळ मूर्तिमंत पावित्र्य उभे राहते. आज आरोग्य शिबिर होते. मुंबईहून अनेक डॉक्टर्स येथे येतात. सर्व प्रकारच्या आजारांवर येथे उपचार केले जातात. क्षय रूग्णांसाठी खास दालन आहे. मोठ्या प्रमाणावर औषधवाटप होते. कपडेवाटपही होते. रुग्णांसाठी खास भोजनव्यवस्थाही आहे. आलेला कोणीही; रूग्ण असो वा नसो, येथून उपाशी जात नाही.

मठाचा परिसर मोठा आहे. येथे मोठी यंत्रशाळा आहे. शिवणवर्ग, इलेक्ट्रिकल, सुतारकाम इ. प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांची निवास-भोजन व्यवस्था केली जाते. वेळापत्रक ठरलेले असते. प्रशिक्षणाशिवाय उर्वरित वेळेत शेती प्रशिक्षण दिले जाते. श्रमदान चालते. चिकू, आंबा, काजू, केळी, पालेभाज्या, धान्यशेती यांनी सकवार आश्रमाचा परिसर बहरून गेला आहे. यात भर आहे बालवाडी संस्कार केन्द्राची.

श्री. सरकार आणि श्री. अवधूत स्वामी यांच्याशी झालेला संवाद अत्यंत प्रेरणादायी होता.

आम्ही पुस्तके खरेदी करायला गेलो असताना त्यांनी आम्हाला आमच्या सर्वांचा परिचय विचारला. तेथेच व्हरांड्यात गोल करून आम्हाला बसविले. आमच्यातील एक होऊन ते आमच्याशी बोलत होते.

शारदामाता, गौरी माँ, भारतीप्राणा अशा अनेक थोर स्त्रियांच्या चरित्राचा परामर्श घेत त्यांनी प्रेरणादायी विचार आमच्या समोर मांडले. ह्या थोर स्त्रियांसारखे आजच्या भारतीय स्त्रीने फक्त शारीरिकदृष्ट्या कणखर

कोणत्याही नित्य यज्ञाशिवाय राष्ट्र उभे राहू शकणार नाही. -विनोबा भावे

न होता मानसिकदृष्ट्याही कणखर होणे किती गरजेचे आहे हे त्यांनी सांगितले. रामकृष्ण मठाची स्थापना नेमकी कोणत्या उद्देशाने झाली, आज भारतभर रामकृष्ण मठाचे काम कशा स्वरूपात चालू आहे, आपण सारेच या मिशनमध्ये कसे सामिल होऊ शकतो. **'स्व'-रूपवर्धिनीचे काम म्हणजेच रामकृष्ण मठाचे काम आहे, तेच निष्ठेने केले पाहिजे असे सांगितले.** तसेच, विवेकानंदांनी युवकांना नेमका कोणता संदेश दिला आहे, विवेकानंदांचा दूरदर्शीपणा कसा होता, तरूणांनी विवेकानंदांचे कोणकोणते साहित्य वाचले पाहिजे इत्यादी विषयांवर मार्गदर्शक, प्रेरणादायी विचार मांडले. या सर्व उद्‌बोधनात तीन तास कसे गेले ते कळलेच नाही. संध्याकाळचा चहा घेऊन व मठातील प्रार्थना करून आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.

परतीच्या वाटेवर पुण्याहून निघताना फक्त खाऊची शिदोरी घेऊन आलेलो आम्ही, जाताना ही अनुभवांची, सेवांची, प्रेरणेची, विविध समाजदर्शनाची, झोकून देऊन काम करणाऱ्या व्रतस्थ कार्यकर्त्यांच्या निष्ठेची भली मोठी शिदोरी घेऊन निघालो. आम्हा सर्वांमध्ये एक नवीन चैतन्य, नवीन उमेद, अदम्य उत्साह संचारला होता. विवेकानंदांचा एकच विचार सर्वांच्या मनात होता **उत्तिष्ठत ! जाग्रत !**

* * *

## साद आपल्यातल्या माणसाला

दूर दिसणाऱ्या डोंगरापलीकडे
डोंगराडोंगरातच आहे एक गाव
तिथली माणसं तशी वेगळी;
पण माणूस हेच त्यांचं नाव।।
गावही असं ते, की जिथे प्रत्येकाची
ऋतूनुसार जागा बदलते
फुलांच्या जागी मात्र, अकरा महिने
काट्यांचेच राज्य असते.।।
तिथली झाडंही बहरण्यापेक्षा
पानझडच पसंत करतात.
उघड्या बोडक्या आकृत्या मग
माळावर एकट्याच दिसतात.।।
गावातल्या त्या असंख्य नजरा
आजही शून्यातच पाहतात;
त्या शून्यातच मग कसं बसं
सारं आयुष्य बसवतात ।।
रूजण, उगवणं अन् कोमेजणं
एवढंच तिथलं जीवन आहे.
त्या उगवण्यामधलं बहरणं मात्र
ते गाव पुरतं विसरलं आहे.।।
ज्ञानाचे ढग त्या गावावर
अजूनही गर्दी करत नाहीत
विकासाचा वारादेखील
गावाच्या दारात थांबत नाही.।।
वाटाच पोहचल्यात त्या गावात
मात्र ध्येयवेडी पाऊले नाहीत.
नजरांनी अजूनही त्या
प्रकाशचं पाहिला नाही ।।
दोन पावलांचीच आज
गरज आहे त्या गावाला
आतूर ते डोळे आज
खुणावतात आपल्याला
आपल्यातल्या त्या माणसाला।।

**सचिन सनगरे**

कृती उरावी पण कर्ता उरू नये. - विनोबाजी भावे

# वार्षिक वृत्त

## शाखा विभाग

### संक्रांत उत्सव :

बालवाडी व बालविभाग : १७ जानेवारी २००४ या दिवशी पाकोळी बालवाडी व बालविभागाचा संक्रांत उत्सव झाला. सुप्रसिध्द कवयित्री डॉ. संगीता बर्वे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. पाकोळी बालवाडीच्या सर्व वर्गांनी आपल्या साभिनय गीतांनी सर्वांच्या टाळ्या मिळवल्या, तर पर्यावरण रक्षणावरच्या नाटिकेने उपस्थितांची शाबासकी मिळवली. वीर



अभिमन्यू बालशाखेने सादर केलेले मानवी मनोरे अत्यंत देखणे होते. संपूर्ण वर्षभर झालेल्या कार्यक्रमांचा, उपक्रमांचा विशेष घटनांचा धावता आढावा बालशाखेतील दोन बाल वर्धकांनी सर्वांसमोर मांडला. वार्षिक वृत्त सादर करण्याच्या या पध्दतीचे कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. संगीता बर्वे यांनी विशेष कौतुक केले. अध्यक्ष या नात्याने संवाद साधताना डॉ. संगीता बर्वे यांनी आपले विचार त्या वातावरणाला साजेशा आपल्या काही काव्यरचना सादर करूनच व्यक्त केले. समाजातील, विशेषत: कष्टकरी स्त्रियांच्या जीवनातील, दु:खे ज्या संवेदनशीलतेने त्यांनी आपल्या रचनेत व्यक्त केली होती, ती ऐकताना उपस्थितांच्या डोळ्यात पाणी उभे राहिले.

शाखा व प्रकल्प विभाग - या विभागाचा संक्रांत उत्सव रविवार दिनांक २५ जानेवारी २००४ रोजी शनिवार वाड्यासमोरील प्रांगणात झाला. सुप्रसिध्द साहित्यिक डॉ. आनंद यादव हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'स्व'-रूपवर्धिनीचे काम सुरू होण्यामागची प्रेरणा, काम सुरू असतानाचे काही प्रेरणादायी प्रसंग व या कामाच्या माध्यमातून लाभलेले यश यावर आधारीत एक प्रसंगनाट्य सादर करण्यात आले.

अध्यक्ष या नात्याने आपले विचार मांडताना डॉ. आनंद यादव यांनी समाजाचे सद्यस्थितीचे चित्रच सर्वांसमोर उभे केले. शहरात झोपडपट्ट्या का वाढतात ? अशा वस्त्यांमधे रहाणाऱ्या लोकांचे मूळ प्रश्न काय आहेत ?



ग्रामीण भागात आजही असलेले अडीअडचणींचे डोंगर आणि त्या तुलनेत केवळ स्वत:च्या सुखासीनतेत लिप्त झालेला समाजाचा एक वर्ग यांचे नेमके चित्र त्यांनी सर्वांसमोर उभे केले. अत्यंत सुबक झुंबराचे पडल्यानंतर जसे तुकडे इतस्तत: पसरतात व ते जसेच्या तसे पुन:

> दिवसेंदिवस खाली खाली जात असलेल्या या आपल्या लोकांच्या उद्धारासाठी आपले संपूर्ण जीवन अर्पण करण्याची तुम्ही प्रतिज्ञा करा. - स्वामी विवेकानंद

जो जोडणे अवघड असते, तशा प्रकारचे चित्र आज समाजात दिसते. या पार्श्वभूमीवर वर्धिनीचे काम अत्यंत मोलाचे आहे व वर्धिनीसारख्या मूलभूत कामांचे मोल आज कदाचित लक्षात येणार नाही; पण काही वर्षांनी समाजाच्या हे निश्चित लक्षात येईल असा विश्वास त्यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

**रक्तदान शिबिर-**

प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने रक्तदान शिबिर झाले. एकूण ७२ पिशव्या रक्त संकलित झाले. या वर्षी व्यवसायी युवक कार्यकर्त्यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या संपन्न झाले.

**'आनंद पाणपोई' -**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी पुणे स्टेशन चौकातील त्यांच्या पुतळ्याला विनम्र अभिवादन करायला हजारो समाजबांधव येत असतात. या दिवशी पूर्ण दिवसभर वर्धिनीच्या वतीने 'आनंद' पाणपोई चालवली जाते. यावर्षी पाणपोईचे उद्घाटन सामाजिक समरसता मंचाचे पुणे शहराचे कार्यवाह श्री. रवी ननावरे यांच्या हस्ते झाले. पूजनीय बाबासाहेबांच्या चरित्रातील प्रेरणादायी प्रसंग त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. पाणपोईच्या माध्यमातून ५,५०० बांधवांची सेवा या दिवशी करता आली. या उपक्रमाचे संचालन आजोळ शाखेच्या ५वी ते ७वी मधील मुला-मुलींनी केले होते.

**उन्हाळी सुटीतील शिबिरे**

**❁ श्रमसंस्कार शिबिरे -**

दिनांक १७ ते २४ एप्रिल या कालावधीत श्रमसंस्कार शिबिरे संपन्न झाली. महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांत आणि पुणे जिल्ह्यातील अनेक गावी गेल्या दोन वर्षांपासून दुष्काळ आहे. पाण्याच्या अभावी लोकांचे जीवन कसे कठीण होते याची अनुभूती मिळावी; तसेच ज्या कारणांनी दुष्काळासारखी स्थिती उत्पन्न होते ती दूर करण्यासाठी आवश्यक अशा जलसंधारणासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून जनजागरणाचे काम करावे. अशा हेतूने शिबिर घेण्याचे ठरविले होते. सातारा जिल्ह्यातील पुणे जिल्ह्याच्या सीमेवरील तीन गावांमध्ये ही शिबिरे झाली. खंडाळा पारगाव, लोहोम आणि विंग या तीन गावांमध्ये वर्धिनीचे विद्यार्थी व खंडाळा एज्युकेशन सोसायटीच्या त्या त्या गावांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. झाडांसाठी खड्डे, पाणी साठविण्यासाठी चर अशा कामांबरोबरच ग्रामस्वच्छतेसारखे कार्यक्रमही शिबिरात झाले. संबंधित गावांतील लोकांशी संवाद साधण्यासाठी पथनाट्यांचा उपयोग करण्यात आला. श्री प्रदीप आगाशे यांनी कीर्तनाच्या माध्यमातून या गावांचे प्रबोधन केले, तर अन्य व्याख्यान सत्रांसाठी श्री शिरीष पटवर्धन, श्री. रामभाऊ डिंबळे, श्री. उदय गुजर व श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी या गावांमध्ये प्रवास केला.

**❁ कथा आणि क्रीडा कौशल्य शिबिर -**

या दोन विषयांवर विशेष भर असलेले वीर अभिमन्यू बालशाखेचे शिबिर १५ ते २० एप्रिल या कालावधीत झाले. अरण्येश्वर शिक्षण संस्थेच्या सहकारनगरातील प्राथमिक शाळेत हे शिबिर झाले. एकूण ५० बाल उपस्थित होते. मुलांना आवडतील अशा कथा सांगण्यासाठी प्रवीण महामुनी, श्री. प्रदीप आगाशे, श्री. श्रीधरपंत फडके उपस्थित होते. नवे खेळ शिकविण्यासाठी श्री. प्रवीण महामुनीसर दररोज मैदानावर उपस्थित असायचे. सौ. केतकर यांनी मुलांना गाणी तसेच प्रार्थना शिकवल्या; तर श्री. दीपक लांबे यांनी जादूचे प्रयोग सादर केले. सौ. स्वातीताई कारेकर यांनी टाकाऊ वस्तूतून टिकाऊ वस्तू बनविण्याचे कौशल्य मुलांना शिकविले. शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सौ. शोभाताई भागवत यांनी मुलांबरोबरच पालकांचेही प्रबोधन केले. लहान मुले

> तुम्ही आपल्या बांधवांवर प्रेम करता काय? ईश्वराला आणखी कुठे शोधाल? हे जे सर्व गरीब, दुःखी व दुर्बल आहेत तेच ईश्वर नव्हेत काय? आधी त्यांची पूजा का करत नाही? - स्वामी विवेकानंद

मोठ्या माणसांचे अनुकरण करतात हा मुद्दा त्यांनी एका गमतीशीर खेळातून प्रभावीपणे मांडला.

### ❁ क्रांतिकारक कथा संस्कार शिबिर

१ ते ६ मे या कालावधीत ५वी ते ७वी वयोगटातील १५० वर्धकांचे क्रांतिकारक कथा संस्कार शिबिर वानवडी येथील अपंग कल्याणकारी संस्थेत झाले.

अज्ञात क्रांतिकारकांच्या प्रेरणादायी कथांच्या माध्यमातून आज देशासाठी मी काय करायला हवे, काय करून शकतो, असे विषय गटचर्चांच्या माध्यमातून मांडले गेले. ज्यांनी हजारो क्रांतिकारी तरूणांचे नेतृत्त्व केले, अशा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जाज्वल्य राष्ट्रभक्तीच्या विविध पैलूंचे दर्शन विद्यार्थ्यांना त्या विषयावरील व्याख्यानातून झाले.

शिबिराचा समारोप हा एक उत्कट अनुभव होता. सेल्वासा मुक्ती संग्रामात प्रत्यक्ष सहभागी झालेले श्री. बिंदूमाधव जोशी हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. विख्यात गायक कै. सुधीर फडक्यांनी सेल्वासा मुक्ती संग्राम यशस्वी करण्यासाठी केलेले धाडस, या संग्रामात सहभागी झालेल्या तरूणांनी आखलेल्या योजना, प्रत्यक्ष संग्राम घडला तो प्रसंग, हा सारा इतिहास मा. बिंदूमाधव जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या समोर मांडला. सर्व शिबिरार्थी, पालक आणि विशेष आमंत्रित हा रोमहर्षक इतिहास ऐकण्यात तल्लीन झाले होते. ज्या क्षणी पोर्तुगिजांची शेवटची निशाणी अर्थात त्यांचा उतरवलेला ध्वज त्यांनी सर्वांना दाखवला, तेव्हा अक्षरशः अंगावर रोमांच उभे राहिले.

### ❁ आरोग्यम् धनसंपदा

एक ते सहा मे याच कालावधीत वर्धिकांचे आरोग्य विषयावरचे शिबिर लॉ कॉलेज येथे संपन्न झाले. दातांची तपासणी, डोळ्यांची तपासणी यासारखे कार्यक्रम शिबिरातच झाल्याने उपस्थित शिबिरार्थींना आपले स्वतःच्या आरोग्याकडे किती लक्ष आहे याची जाणीव झाली. ऋतुमानाप्रमाणे आहार, आयुर्वेदाचे महत्त्व, दैनंदिन जीवनातील व्यायामाचे महत्त्व, वाढत्या वयातील आरोग्यविषयक समस्या इत्यादी विषयांवरील व्याख्यान सत्रांमुळे 'चांगले आरोग्य हे धनाइतकेच महत्त्वाचे आहे' याची जाणीव मुलींच्या मनात उत्पन्न झाली. संस्थेचे संस्थापक कार्यवाह श्री. रा. प. देसाई यांनी शिबिराच्या समारोप प्रसंगी सर्वांना मार्गदर्शन केले. सकारात्मक विचार आणि आनंदी वृत्तीचा शरीरावर होणारा सुपरिणाम हा विषय त्यांनी सर्वांसमोर मांडला.

## दिवाळी सुटीतील शिबिरे

इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची दोन शिबिरे या महिन्यात झाली. एकूण २८५ विद्यार्थी व युवक यांमध्ये सहभागी झाले होते. यामध्ये ज्या विद्यार्थ्यांना खेळामध्ये रुची आहे, ज्यांचे काही प्रशिक्षण झाले आहे किंवा जास्ती गती आहे, अशांची निवड करून त्यांच्यासाठी क्रीडा शिबिर; तर शाखांमधील उर्वरीत वर्धक वर्धिका ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्यासाठी विज्ञान शिबिर आयोजित केले होते.

### ✦ विज्ञान शिबिर



अपंग कल्याणकारी संस्था वानवडी येथे दि.५ ते १० नोव्हेंबर या काळात १८५ मुले व ५० मुली यांचे विज्ञान जागरुकता शिबिर झाले.

> मत्सर आणि अहंकार यांचा त्याग करून दुसऱ्याच्या हितासाठी एकजुटीने कार्य करण्यास शिका. याचीच आपल्या देशाला आज गरज आहे. - स्वामी विवेकानंद

दैनंदिन जीवनातील विज्ञानाबद्दलची जाणीव जागृती, प्रत्येक गोष्टीमागील शास्त्रीय तत्त्व जाणून घेण्याची मुलांना सवय लागावी, याकरिता हे शिबिर घेण्यात आले. सकाळ-संध्याकाळ मैदानी खेळ व दुपारच्या वेळामध्ये प्रत्यक्ष विविध प्रयोग स्वतः करून पाहणे, काही प्रकल्प करणे, असा दैनंदिन कार्यक्रम होता. संध्याकाळच्या वेळांमध्ये काही मनोरंजनात्मक खेळांमागील विज्ञान जाणून घेणे, शास्त्रीय विषयावरील चित्रपट पाहणे, प्रश्नमंजूषा, खेळ, प्राणीजीवना-विषयीच्या काही चित्रफिती पाहणे असे विविध कार्यक्रम झाले.

डॉ. देवपूरकर यांनी विज्ञान अभ्यासाचे महत्त्व सांगितले. अवकाश संशोधनाबद्दल शास्त्रज्ञ डॉ.प्रदीप कुरूलकर; तर विविध शस्त्रांची प्रात्यक्षिकांसह माहिती देण्यासाठी कॅप्टन् सनत भाटे यांनी आपला वेळ दिला. सौ.बागेश्री पोंक्षे यांनी लहान गटाला कार्व्हरचे चरित्र सांगितले, तर श्री. गुलाबराव सपकाळ सरांनी विज्ञानकथा सांगितली. शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मोघे यांच्या हस्ते शिबिराचा समारोप झाला.

### ✦ क्रीडा शिबिर - २००४

दि. ४ नोव्हेंबर २००४ ते दि.९ नोव्हेंबर २००४



या कालावधीत ज्ञानप्रबोधिनी, नवनगर विद्यालय, निगडी येथे शिबिर संपन्न झाले.

वर्धिनीच्या शाखांवर वर्धक दररोज मैदानावर खेळतात. तेव्हा जाणवते की, आपल्या मुलांमध्ये-सुद्धा काही क्रीडागुण आहेत आणि काही खेळाडूसुद्धा आहेत. त्यांच्यातील क्रीडाकौशल्याचा शोध घ्यावा, नवीन खेळ माहीत व्हावेत व त्यात त्यांनी प्रावीण्य मिळवावे यासाठी या शिबिराचे आयोजन होते.

शिबिराचे कार्यक्रम ठरविताना अॅथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, कुस्ती, मल्लखांब अशा वैयक्तिक खेळांची निवड करण्यात आली. ज्ञान प्रबोधिनीच्या क्रीडाकुलातील खालील शिक्षकांची प्रशिक्षक म्हणून खूप मोलाची मदत मिळाली.

- अॅथलेटिक्स - श्री. मनोज देवळेकर,
  श्रीमती संपदा कुलकर्णी
- जिम्नॅस्टिक - श्री. सागर कुलकर्णी
- मल्लखांब - श्री. हनुमंत कदम
- कुस्ती - श्री. राजेंद्र सुतार

शिबिरार्थी रोज सकाळी दोन तास व संध्याकाळी एक तास खेळांचे प्रशिक्षण घेत होते.

या खेळांच्या प्रशिक्षणाबरोबरच धर्नुविद्या, रायफल शुटींग व ज्युदो या क्रीडा प्रकारांची ओळख करून देण्यात आली. संध्याकाळच्या वेळी शिबिरार्थी रायफल शुटींग करण्यात रमत. वर्धिनीच्या शिबिरात पहिल्यांदाच धनुर्विद्या व रायफल शुटींग ठेवण्यात आले होते. त्याचा मुलांनी भरपूर आनंद लुटला. काही युवकांना या प्रकारांमध्ये चांगली गती आहे असे जाणवले. श्री.रणजीत चामले यांनी धनुर्विद्या व रायफल शुटींगचे तर श्री.अभिजीत पवार यांनी ज्युदोचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले.

शिबिराच्या उद्घाटन सत्राला द्रोणाचार्य पुरस्कार विजेते मा. श्री. गोपाळराव फडके उपस्थित होते. त्यांनी मुलांना मार्गदर्शन करताना क्रीडापटूंसाठी सातत्यपूर्ण मेहनतीचे असणारे महत्त्व अनेक उदाहरणे देऊन सांगितले.

> जोवर श्रद्धा, सचोटी आणि अढळ निष्ठा तुमच्या ठायी आहेत तोवर
> सर्व बाजूंनी तुमची भरभराट होईल - स्वामी विवेकानंद

शिबिरात खालील विषयांवर व्याख्याने झाली.

- क्रीडापटूचा आहार - सौ.पद्मश्री बोरकर
- खेळाडूंच्या प्रगतीत क्रीडाकुलाचे स्थान आणि क्रीडामानसतज्ज्ञांची गरज काय? सौ.गीताताई मुथया
- ऑलिम्पिक स्पर्धांचा इतिहास - श्री. मनोज देवळेकर
- चांगल्या आरोग्यासाठी पंचकर्म - वैद्य मिलिंद सैद

याचबरोबर क्रीडाकुलातील जे विद्यार्थी राष्ट्रीय स्पर्धा खेळून आले, त्यांचे अनुभवकथन व मुलाखतीचा कार्यक्रम झाला. क्रीडा या विषयावरील प्रश्नमंजूषा अत्यंत चुरशीची झाली.

शिबिराच्या समारोप सत्राला स. प. महाविद्यालयाच्या क्रीडाविभागाचे प्रमुख प्रा. राघव अष्टेकर उपस्थित होते. त्यांनी मुलांना त्यांचे क्रीडांगणावरील अनुभव, तसेच खेळाचे जीवनात असणारे अनन्यसाधारण महत्त्व सांगितले.

**नियोजन बैठका-**

**बैठक क्र. १ -**

५ व ६ जून रोजी वर्धिनीच्या इमारतीवर ही बैठक झाली. नवीन शैक्षणिक वर्षात मुलांच्या शाखा विभागाचे काम पाहणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी ही बैठक होती. मागील वर्षाचा वैयक्तिक आढावा, शाखेच्या कामांच्या नियोजनाची आवश्यकता, शाखास्तरावर अपेक्षित कार्यक्रमांमागचा विचार, व्यवस्थापकीय कामांसाठी आवश्यक कौशल्य, (मनोरंजक खेळांच्या माध्यमातून) इत्यादी विषयांवर मार्गदर्शन सत्रे, गटचर्चा घेण्यात आल्या. पस्तीस कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

**बैठक क्र. २ -**

मुलांच्या शाखा विभागातील कार्यकर्त्यांची वार्षिक नियोजनाच्या संदर्भातील एक बैठक ४ जुलै रोजी झाली. नव्या शैक्षणिक वर्षात ज्यांच्यावर शाखा विभागाची जबाबदारी देण्यात येणार आहे अशा कार्यकर्त्यांसाठी प्रामुख्याने या नियोजन बैठकीचे आयोजन केले होते. व्यक्तिगत नियोजन आणि कामाचे नियोजन करताना घ्यावयाची काळजी, नियोजनाची आवश्यकता अशा विषयांवर मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली. श्री. ज्ञानेश पुरंदरे, डॉ. प्रदीप आगाशे, श्री. शिरीष पटवर्धन आणि श्री रामभाऊ डिंबळे यांनी या बैठकीला मार्गदर्शन केले.

**वर्धिनी कार्यप्रसारासाठी झालेला प्रवास**

श्रीमती पुष्पाताई नडे व श्री. ज्ञानेश पुरंदरे हे मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात जोधपूर येथे; तर जूनच्या दुसऱ्या आठवड्यात श्री. शिरीष पटवर्धन व श्री. उमेश बिबवे यांनी दिल्ली येथे वर्धिनीच्या कार्यप्रसारासाठी प्रवास केला. विद्याभारती व सेवाभारती या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्त्यांबरोबर वर्धिनीच्या कामाची पद्धत, विद्यार्थी-निवड प्रक्रिया, कार्यक्रम, कामाची उपलब्धी अशा विषयांवर प्रदीर्घ चर्चा झाली. संबंधित संस्थांनी चालविलेले प्रकल्पही या कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष पाहिले.




**वृक्षारोपण कार्यक्रम**

हडपसर येथील तुकाई टेकडी व जनवाडीजवळील वेताळ टेकडी येथे रामकृष्ण शाखेमधील युवक व वर्धकांनी जाऊन ५० वृक्ष लावण्याचा कार्यक्रम केला. वृक्षारोपणाच्या कृतीकार्यक्रमाने पर्यावरण समस्येवरील शाखेत होणाऱ्या चर्चेला अर्थ प्राप्त झाला.

> गाजावाजा न करता, शांतपणे व धीर धरून एकसारखे कार्य करीत रहा.
> जाहिरातबाजीच्या व नावाच्या पाठीमागे लागू नका. - स्वामी विवेकानंद

**विज्ञान प्रकल्प स्पर्धा**



गेल्या काही वर्षांपासून विज्ञान दिनाच्या निमित्ताने शाखा पातळीवरची ही स्पर्धा वर्धिनीत संपन्न होते. १) ५वी ते ७वी, २) ८वी ते १०वी व ३) युवक-युवती अशा तीन गटांमध्ये ही स्पर्धा होते. यावर्षी दिनांक ८ फेब्रुवारीला ही स्पर्धा झाली. सर्व गटांसाठी पर्यावरण विषयावरील पोस्टर स्पर्धाही घेण्यात आली. विजेते गट / स्पर्धक व त्यांचे विषय पुढीलप्रमाणे :

<u>पोस्टर स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे विजेते</u> -

८वी ते १० वी गट – नवनाथ वाघ (योगानंद शाखा)

युवक युवती गट – कु. लता टिळेकर

<u>विज्ञान प्रकल्प स्पर्धेतील विजयी गट</u> –

५वी ते ७वी गट – गांडूळखत प्रकल्प (अभेदानंद शाखा)


८वी ते १०वी गट – अणुसंरचना (भगिनी निवेदिता शाखा)

युवक–युवती गट – पाणी व शेती व्यवस्थापन– किशोर बेलोसे.

या गटांवर परीक्षक म्हणून सौ. कुलकर्णी, सौ. नवले, डॉ. देवपूरकर व डॉ. पुणतांबेकर यांनी काम पाहिले. डॉ. देवपूरकर यांनी प्रकल्प कसा सादर करावा, याविषयी मार्गदर्शन केले तर डॉ. पुणतांबेकर यांनी प्रकल्प म्हणून एखाद्या विषयाचा अभ्यास कसा करावा, याविषयी मार्गदर्शन केले. यशस्वी वर्धक-वर्धिकांना डॉ. प्रदीप आगाशे यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

**मोहिमा गडांच्या :**

बारावी व दहावीच्या परीक्षा झालेल्या युवकांना घेऊन रायगड व हरिश्चंद्र गडाची मोहिम आखण्यात आली होती. वर्षभर केवळ अभ्यास या विषया व्यतिरिक्त ज्यांच्याशी फार संवाद होऊ शकला नाही, अशा या दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांबरोबर अनौपचारिक गप्पा व्हाव्यात, या हेतूने १२वीचा गट घेऊन श्री. शिरीष पटवर्धन रायगडावर तर १० वी चा गट घेऊन श्री. ज्ञानेश पुरंदरे हरिश्चंद्र गडावर जाऊन आले. सौरभ वीरकर आणि मल्लेश मोरे यांनी सहलप्रमुख म्हणून काम पाहिले. २२ ते २७ मार्च या कालावधीत या दोन्ही दुर्गभ्रमण सहली झाल्या.



गडावर निवास, चुलीवरचा स्वयंपाक, आणि गडावरच्या प्रसन्न प्रेरणादायी वातावरणात रंगलेल्या चर्चा ... परतीची वेळ झाल्यावरही निघू नये अशा मनस्थितीत सर्वजण होते.

**आकाशवाणीवर संस्था परिचयाचा कार्यक्रम**

आकाशवाणीच्या पुणे केंद्राने शनिवार दि. ७ ऑगस्ट रोजी स्वरूपवर्धिनीच्या कार्याचा परिचय 'युववाणी' कार्यक्रमाच्या अंतर्गत प्रक्षेपित केला. मुलाखतीमध्ये संस्थेच्या वतीने श्री. शिरीष पटवर्धन, श्री. संजय तांबट, सौ. रोहिणी दिघे, श्री. संदीप मोरे, श्री. संतोष लोखंडे व कु. विद्या कुडलिंगार यांनी सहभाग घेतला होता. हा कार्यक्रम जनसेवा भोजनालयाने पुरस्कृत केला होता.


सदर मुलाखत ऐकल्यावर वैद्य श्री. चंद्रशेखर जोशी व त्यांच्या पत्नी वैद्य सौ. उमाताई यांनी वर्धिनीला रू. ३०,०००/- ची देणगी दिली. दोन देणगीदार वर्धिनीत येऊन देणगी देऊन गेले, तर एका युवकाने दूरध्वनीवरून वर्धिनीची माहितीपत्रके पाठविण्याची विनंती केली.

दुसऱ्यासाठी केलेले अत्यंत लहानसे काम देखील अंतःस्थ शक्ति जागृत करते - स्वामी विवेकानंद

**अक्रोडाचे झाड**

स्वातंत्र्यदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विख्यात साहित्यिक श्री. द. मा. मिरासदार हे उपस्थित होते. कै. किशाभाऊंचे स्मरण करताना त्यांनी विद्यार्थ्यांना 'अक्रोडाचे झाड' ही रूपक कथा सांगितली. फळ खायला मिळणार नाही हे माहिती असूनही नातवांसाठी अक्रोडाचे झाड लावणाऱ्या आजोबांची गोष्ट सांगत श्री. मिरासदार यांनी कै. किशाभाऊंनी निवृत्तीनंतर केलेल्या कामाचा यथोचित गौरव केला.

उपस्थित विद्यार्थ्यांना कथाकथन कसे करायचे असते, याचा सुंदर वस्तुपाठच त्यांनी सादर केला. अंधश्रद्धेची रेवडी उडविणारी 'भानाचे भूत' ही कथा सांगताना आवाजावरील त्यांची हुकूमत, त्यांची देहबोली यातून कथाकथनाची होणारी परिणामकारकता सर्वांना अनुभवली.



**कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग -**

**प्रथम पुष्प**

रविवार दिनांक २५ जुलै रोजी हा वर्ग झाला. आपले शिक्षण चालू असताना शाखेचे काम पहाणाऱ्या कार्यकर्त्यांचे स्वतःचे करिअरही महत्त्वाचेच आहे. या दृष्टीने वाचन कौशल्य, टिपण कौशल्य व अभ्यासाचे नियोजन अशा तीन विषयांवर मार्गदर्शन सत्रे आयोजित केली होती. सौ. मीनलताई नरवणे, डॉ. सौ.अनघाताई लवळेकर व कुमारी प्रज्ञा जगताप यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन सत्राला जोडून छोटे प्रत्यक्ष सरावसत्रही घेतले गेले. या अभ्यासवर्गाचा समारोप कु. आनंद देवपूरकर याच्या उपस्थितीत झाला. गणित ऑलिंपियाडमध्ये रौप्यपदक मिळवून आनंदने आपल्या देशाचे नाव जगात उज्ज्वल केले आहे. त्याच्या या पराक्रमाबद्दल त्याचा गौरव करण्यात आला. युवकांशी गप्पा मारताना आनंदने वेगवेगळ्या विषयांचे शिक्षण घेताना त्याने काय मिळविले, सुट्टीकडे तो कसा बघतो याविषयी त्याचे विचार मांडले. गणित, ऑलिंपियाडसाठी तयारी कशी केली, अशा स्पर्धात्मक परीक्षांमुळे कोणकोणत्या अन्य संधी मिळतात, याचीही माहिती त्याने सर्वांना सांगितली.

**द्वितीय पुष्प**

दि. १२ सप्टेंबर २००४ रोजी वर्ग झाला. दिवसभर झालेल्या या वर्गाला ४० कार्यकर्ते उपस्थित होते. ज्ञानप्रबोधिनीचे प्राचार्य श्री. विवेक पोंक्षे यांनी 'व्यक्तिमत्त्व विकसन म्हणजे काय? का? कसे?' या विषयांवर मांडणी केली. गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथे आदिवासीसाठी काम करणाऱ्या डॉ. प्रकाश व डॉ. मंदाताई आमटे यांच्या जीवनावरील ''अरण्यातील प्रकाशवाटा'' या चित्रफीतीच्या साहाय्याने त्यांच्या कामाविषयीची प्रेरणादायी माहिती कार्यकर्त्यांनी करून घेतली. तसेच मा. यशवंतराव लेले यांनी कार्यकर्त्यांचा दिनक्रम कसा असावा याबद्दल मार्गदर्शन केले.

**पुष्प तिसरे-**

वर्ग दि. ५ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० ते सायंकाळी ६.१५ या काळात झाला. ४५ कार्यकर्ते वर्गास उपस्थित होते.

Good cause makes a stout heart and a strong arm.

श्री. गिरीशराव प्रभुणे यांनी भटके-विमुक्त विकास परिषदेच्या कामातील त्यांचे अनुभव सांगितले. भटके विमुक्त विकास परिषदेच्या माध्यमातून एकूण ४५ विविध भटक्या-विमुक्त जनजातींपैकी २५ जनजातींमध्ये काम चालू असून ते शिक्षण, आर्थिक स्वावलंबन व संघटना या तीन आयामांना स्पर्श करते. आपल्या अनुभवकथनात त्यांनी कार्यकर्ता कसा असावा व कसा नसावा याविषयी सांगितले; तसेच पारधी समाजातील कामामध्ये आलेले विशेष अनुभवही सांगितले.

यानंतर 'स्वतःला कसे ओळखावे, स्वतःच्या विविध 'स्व'भावांच्या पैलूंना कसे समजून आत्मसात करून घ्यावे, स्वतःला व इतरांना ओळखून घेऊन आपल्या 'स्व'च्या सहजप्रवृत्तीला साजेसे काम केले, तर स्वतःचा विकास होणार आहे, असे श्री. शिरीष जोशी यांनी **ओळख 'स्व'ची** या सत्रात सांगितले. व्यक्तिमत्त्व विकासातील एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे स्वधर्म ओळखणे या पहिल्या पायरीतील बरेच पैलू त्यांनी उलगडून दाखविले.

'स्व'-रूपवर्धिनीतील युवक-युवतींचे दोन दौरे अनुक्रमे संभाजीनगर व ठाणे आदिवासी भागात झाले. त्या दौऱ्यांचे वृत्त निवेदनही या बैठकीत करण्यात आले. तसेच संवादिनी गट (ज्ञानप्रबोधिनी) यांनी आनंदवन व शोधग्राम-हेमलकसा येथील कामांना भेटी दिल्या त्याचेही निवेदन यावेळी सौ. माधवी पटवर्धन यांनी केले.



**गुणगौरव कार्यक्रम वृत्त** - रविवार दिनांक ५ सप्टेंबर २००४ रोजी गुणगौरव कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कार्याध्यक्ष श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्याध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन यांनी केले. ३ री, ४ थीच्या ९ जणांना तर ५ वी ते पदव्युत्तर वर्धक वर्धिका व युवक युवती गटातील १०५ जणांना या कार्यक्रमात गौरवण्यात आले.



शैक्षणिक वर्षात शालेय गुणवत्ता, क्रीडा, कला, नाट्य, अभिनय इत्यादी विषयांमध्ये ज्यांनी उत्तम कामगिरी केली अशांचे कौतुक करण्यात आले. बक्षिसपात्रतेसाठी खालील निकष ठेवले होते.

१) इ. २ री व ३ री वार्षिक परीक्षेत ९० % चे वर गुण.
२) इ. ४ थी वार्षिक परीक्षेत ८५ % चे वर गुण.
३) इ. ५ वी ते १० वी वार्षिक परीक्षेत ८० % चे वर गुण.
४) महाविद्यालयीन परीक्षा- विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण.
५) वर्षभरात कला, क्रीडा, शालाबाह्य परीक्षा इत्यादींमध्ये प्रथम श्रेणीची / क्रमांकाची पाच पारितोषिके.
६) मागील वर्षीच्या तुलनेत वार्षिक परीक्षेच्या गुणांमध्ये किमान १०% वाढ.

ज्यांना शिवाची सेवा करावयाची आहे त्यांनी प्रथम शिवाच्या या संतानांची - जगातील या समस्त जीवांची सेवा केली पाहिजे. - स्वामी विवेकानंद

या कौतुक सोहळ्यानंतर श्री. संदीप मोरे यांनी 'हम होंगे कामयाब' हे गीत सादर केले. गीतानंतर प्रमुख मार्गदर्शक श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुलांनी या वयात कोणत्या गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष द्यायला हवे हे सांगताना ते म्हणाले ''शरीरमाद्यं खलू धर्मसाधनम्. शरीर चांगले कार्यक्षम, तर बाकी सर्व शक्य आहे. हे शरीर निरोगी आणि बलवान ठेवण्यासाठी योगासने, प्राणायाम व खेळ या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे. प्राणायामाच्या अभ्यासामुळे विचारांना स्थिरता येते, मन एकाग्र होते व याच्या बळावर इतर अनेक गोष्टी साध्य करता येतात. वाचन आणि पाठांतराची सवय लावली तर त्याचे अनेक प्रकारे लाभ जीवनात होतात पण वाचायचं काय आणि पाठ काय करायचं हे सुद्धा नीट ठरवले पाहिजे. या शिकण्याच्या वयात विविध श्लोक, ओव्या, अभंग, फटके, गाणी, स्तोत्रे, आरत्या, पोवाडे हे पाठ करावेत. त्यातील विचार आयुष्यभर साथ देतात. वाचायला तर विपूल साहित्य भांडार आपल्याला उपलब्ध होऊ शकते; पण किमान काही लेखकांचे साहित्य तर वाचायलाच हवे. उदा. श्री. म. माटे, पु. ग. सहस्त्रबुद्धे, ग. दि. माडगूळकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, राम गणेश गडकरी, विनोबा भावे (किमान त्यांची गीताई). तसेच इंग्रजी साहित्यातील जॉर्ज बर्नाड शॉ, रसेल, हेमिंग्वे, मार्क ट्वेन इ. लेखकांचे साहित्य आपण वाचलेच पाहिजे.

या उमलत्या वयात विविध छंद जोपासायलाच हवेत- पण हे छंद सुद्धा विचारपूर्वक जोडावेत. प्रवासाचा छंद आणि या प्रवासातच निरीक्षण करण्याची सवय जोडून घेतली तर फारच छान. प्रवासाचा छंद जोडणाऱ्याने कधीतरी हिमालयात हिंडले पाहिजे. निसर्गाचे हे रूप जवळून अनुभवण्याचा आनंद काही वेगळाच आहे. सुभाषितांचे संकलन करण्याचा छंद हा व्यक्तिमत्त्वाला एक वेगळीच ताकद देईल. आपल्या मातृभाषेव्यतिरिक्त अन्य अनेक भाषा आपल्याला यायला हव्यात. आपण सतत कार्यरत रहायलाच हवे.'' सतत कार्यरत रहाण्याच्या बाबतीत आपल्यासमोर कै.किशाभाऊंच्या आदर्श आहे, याचे स्मरण त्यांनी या निमित्ताने सर्वांना करून दिले.

**शाखांचे नामकरण**

एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्ताने गतवर्षी सुरू झालेल्या तीन नवीन शाखांचे नामकरण याच कार्यक्रमात करण्यात आले. त्यांची नावे खालीलप्रमाणे-

१)स्वामी दयानंद सरस्वती शाखा.

२) महर्षी श्रद्धानंद शाखा.

३) स्वामी ब्रह्मानंद शाखा.

या तीनही महापुरुषांच्या चरित्राचे संक्षिप्त वाचन करण्यात आले व त्यांच्या प्रतिमा संबंधित शाखांना प्रदान करण्यात आल्या.

**गणेशोत्सव-**

वर्धिनीच्या शाखा विभागाने विविध प्रकारांनी गणेशोत्सवात सहभाग घेतला; तसेच वेगळेपणाने काही कार्यक्रमही घेतले.

**★ अथर्वशीर्ष पठण-**

बालवाडीच्या मोठ्या गटातील १०० मुलांनी सात गणेशमंडळांसमोर अथर्वशीर्षाचे पठण केले.

**★ पथनाट्ये -**

शाखेतील वर्धकांनी पुण्याच्या विविध भागांतील पस्तीस गणेशमंडळांसमोर पथनाट्ये सादर केली. या पथनाट्यांमधून लोकमान्य टिळकांनी कोणत्या उद्दिष्टांनी हा उत्सव सुरू केला, महाराष्ट्राची एकूण सण -उत्सव

> निस्वार्थपरता हीच धर्माची कसोटी होय. जो जितका जास्त निःस्वार्थ,
> तितका तो अधिक धार्मिक व शिवाच्या अधिक निकट असतो. - स्वामी विवेकानंद

यांची परंपरा, त्यातील सांस्कृतिक वास्तवाचे दर्शन हे 'परिवर्तन' नावाच्या पथनाट्यातून दाखविले गेले. प्लास्टीकच्या प्रदूषणाच्या भस्मासुराबद्दलचेही एक पथनाट्य होते. ही पथनाट्ये स्वतः वर्धकांनी रचलेली व सादर केलेली होती.

**★ मिरवणुकीतील सहभाग -**

दरवर्षीप्रमाणे यंदाही तुळशीबाग सार्वजनिक गणेश मंडळाच्या विसर्जन मिरवणुकीत 'स्व'-रूपवर्धिनीने सहभाग घेतला. पहिल्या दिवशी एकूण चार मंडळांसमोर; तर विसर्जनाच्या दिवशी तीन मंडळांसमोर वर्धिनीची पथके होती. सर्व पथकांमध्ये मिळून ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**★ नाविन्यपूर्ण उपक्रम -**

स्वामी श्रद्धानंद शाखेतील मुलांनी गणपतीच्या दहा दिवसांत गणिताची उदाहरणे सोडविण्याचा नाविन्यपूर्ण उपक्रम केला; तर स्वामी ब्रह्मनंद शाखेतील वर्धकांनी विविध विषयांवरील किमान २१ प्रश्न सोडवून नैवेद्य दाखवायचा उपक्रम केला.

**★ गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा पूजा प्रशिक्षण वर्ग**

गणेशोत्सवाच्या काळात समाजातील वातावरण एक वेगळ्याच उत्साहाचे असते. घराघरातही गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. प्राणप्रतिष्ठेचा हा पूजाविधी सामान्य व्यक्तीलाही करता येतो; हा विश्वास दृढ करण्याच्या हेतूने व आपण जी पूजा करतो, त्यासाठी जे मंत्रोच्चार करतो त्याचा अर्थ काय आहे, हे समजावून घेऊन ती पूजा करता यावी, या हेतूने प्राणप्रतिष्ठा पूजा प्रशिक्षण वर्गाची योजना यावर्षी वर्धिनीने केली होती. याचा पहिला टप्पा म्हणून वर्धिनीच्याच पन्नास वर्धक वर्धिकांना हा पूजाविधी शिकवण्यात झाला. ११ सप्टेंबर रोजी हे प्रशिक्षण देण्यात आले. या वर्गाला उपस्थित असलेल्या काही वर्धकांनी-युवकांनी मुलांच्या घरची पूजा याच पद्धतीने सांगितली. एकूण आठ विद्यार्थ्यांच्या घरी अशा प्रकारे प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. दुसऱ्या टप्प्यासाठी नागरिकांना खुले आमंत्रण केले होते. हे आवाहन दैनिक सकाळच्या निवेदन सदरामधून तसेच पुणे आकाशवाणी वरील प्रादेशिक बातम्यांच्या माध्यमातून करण्यात आले होते. १६ सप्टेंबर रोजी हा प्रशिक्षण वर्ग झाला. सुमारे ६५ स्त्रीपुरुषांनी या प्रशिक्षण वर्गात सहभाग घेतला. या दोन्हीही प्रशिक्षण वर्गांना मार्गदर्शन करण्यासाठी ज्ञानप्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते व संत्रिका विभागाचे प्रमुख प्राचार्य यशवंतराव लेले उपस्थित होते. या प्रशिक्षण वर्गानंतर उपस्थित स्त्री-पुरुषांनी अशा प्रकारचे प्रशिक्षण वर्षभर देण्याची विनंती केली व असा वर्ग घेतला, तर त्याचा प्रतिसाद देण्याची इच्छाही व्यक्त केली.

❑❑❑

**अखिल भारतीय पातळीवरील एकांकिकेने पटकावले तिसरे बक्षिस!**

भारत संचार निगम लिमिटेडच्या वतीने यंदा पुणे विभाग, महाराष्ट्र राज्य विभाग व राष्ट्रीय पातळीवर आयोजित केलेल्या स्पर्धेत 'स्व'रूपवर्धिनीचे वर्धक श्री. श्रीकांत यादव यांनी सहभाग घेतलेल्या 'पुरूषार्थ' या एकांकिकेस पहिल्या दोन्ही पातळींवर प्रथम क्रमांक, तर राष्ट्रीय पातळीवर तृतीय क्रमांक मिळाला.

A good teacher has been defined as one who makes himself progressively unnecessary.

### व्यावसायिक युवकांची सहल

व्यावसायिक युवक गटाच्या मासिक कार्यक्रमाच्या अंतर्गत १६ मे रोजी पाबळ येथील विज्ञान आश्रम संस्थेचे काम पाहण्यासाठी एका सहलीचे आयोजन करण्यात आले होते. विज्ञान आश्रम संस्थेचे श्री. योगेश कुलकर्णी यांनी संस्थेच्या कामाचा विस्तृत परिचय करून दिला. अपुरे शिक्षण झालेल्या (विशेषतः ग्रामीण भागाची पार्श्वभूमी असलेल्या) तरूणांच्या मनात स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि आत्मविश्वास उत्पन्न करण्यात या संस्थेला मिळालेले यश खरोखरीच कौतुकास्पद आहे. या सहलीच्या निमित्ताने व्यासायिक युवक गटाच्या बांधणीचाही विचार झाला. तसेच आगामी काळात कोणत्या विषयावर मासिक बैठका व्हाव्यात, याविषयी चर्चा झाली.

### संगीतमय कोजागिरी

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या गीतांवर आधारित एक कार्यक्रम कोजागिरीच्या निमित्ताने रविवार दि. २४ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. श्री. जयंतराव कवठेकर यांनी निवेदनातून स्वातंत्र्यवीरांचे संघर्षशील व त्यागमय जीवन उभे केले आणि त्याचवेळी त्यांच्यातील काव्यप्रतिभेचे दर्शनही सर्वांना घडवले. या कार्यक्रमामध्ये सर्वश्री अविनाश जोशी, विजय केळकर, कु. श्वेता कुलकर्णी, सौ. बागेश्री पोंक्षे यांनी गीते सादर केली. श्री. मिलिंद सबनीस व श्री. केदार पारगांवकर यांनी या गीतांना आपल्या सुरेल साथीतून अधिक श्रवणीय केले.

### अभ्यास व नियोजन कौशल्य शिबिर

वर्धिनीतील ८वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यास व नियोजन कौशल्य या विषयावरचे एक दिवसाचे शिबिर झाले. या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी सौ. शुभदाताई पेंढारकर या उपस्थित होत्या.

### मासिक स्मृतिदिन ... संकल्पदिन कार्यक्रम

संस्थापक कै. श्री. किशाभाऊ पटवर्धन सरांच्या मासिक स्मृतीदिनाच्या दिवशी म्हणजे २९ ऑगस्ट रोजी एका संकल्प सभेचे आयोजन केले होते. रक्षाबंधनासारखा सण असूनही संध्याकाळी ७ ते ९ या वेळात असलेल्या या कार्यक्रमाला ८५ युवक युवती व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. श्री. रामभाऊ डिंबळे या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक होते. कै. किशाभाऊंचे म्हणजे त्यांच्या कार्याचे स्मरण करून देताना ते म्हणाले, "स्वामी विवेकानंदांचे आपल्या गुरूबंधूंना असे सांगणे होते की रामकृष्णांच्या तत्तवानुसार आचरण करावे, केवळ त्यांच्या प्रतिमेचे पूजन करू नये. स्मरण करून देते ते स्मारक. कै. किशाभाऊंसारखे सतत कार्यशील राहून आपण प्रत्यक्ष काम केले तर ते त्यांचे खरे स्मारक होईल. अनेकदा भक्त आपल्या आराध्यदेवतेवर (शेंदूराची अथवा स्तुतीची)एवढी पुटे चढवितात की त्याचे मूळ स्वरूपच नष्ट होते. त्याचप्रमाणे ज्यांच्या स्मरणासाठी आपण जमलो आहोत, त्या कै. किशाभाऊंच्या गुणांचे वर्णन करणाऱ्या नुसत्या भावना व्यक्त करून काय उपयोग? प्रतिभा, क्षमता सर्वत्र असते, उपेक्षिततातही असते. त्यांचा शोध घेऊन, त्यांच्यामधून देशहितासाठी झटणारे निस्वार्थी सक्षम कार्यकर्ते घडविणे हा विचार केंद्रस्थानी ठेऊन कै.किशाभाऊंनी वर्धिनी घडविली. हे सूत्र समोर ठेऊन आपण काम करायला हवे. सेवेची, करुणेची आणि ममत्त्वाची भावना या कामात महत्वाची आहे, हे कै. किशाभाऊंनी संपर्कात आलेल्या सर्वांच्या मनात पेरले. त्यानुसार आपला आचार विचार असला पाहिजे."

या प्रमुख मार्गदर्शन सत्रानंतर विविध गटांमध्ये कार्यकर्ते गटचर्चेसाठी एकत्र जमले. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपला व्यक्तिगत संकल्प निश्चित करावा, तसेच सामूहिक स्तरावरही काही संकल्प करावेत अशी या गटचर्चेमागची कल्पना होती. अशा या संकल्पांमधून

> पवित्र बनणे आणि दुसऱ्यांचे हित करणे हेच साऱ्या उपासनेचे सार होय. - स्वामी विवेकानंद

अपेक्षित कृतीच्या दिशेने कामाची आखणी सुरू झाली आहे.

**दिवाळी सुटीमधील झालेले कार्यक्रम -**

या कालावधीत शाखा विभागात खालील कार्यक्रम संपन्न झाले.

**क्रीडा स्पर्धा व कार्यक्रम** - सिंहगड चढणे, फुटबॉल, जोर काढणे, धावणे, कात्रज ते सिंहगड पदभ्रमण.

**कला स्पर्धा** -पद्यमंजूषा, किल्ले बनवा स्पर्धा, निबंधलेखन, पोस्टर बनवा स्पर्धा

**सांस्कृतिक** - गुरूनानक जयंतीनिमित्त गुरूद्वाराला भेट,

**कलास्वाद** - ॲनिमेशन चित्रपट - श्री शिवाजी महाराज, विज्ञान विषयावरील चित्रपट, पन्हाळा ते विशाळगड (चित्रफीत), ग्रंथप्रदर्शन

**शाखा वर्धापन दिनाचे कार्यक्रम**

गेल्या वर्षी तीन नवीन शाखांची सुरुवात झाली. या तीनही शाखांचा वर्धापन दिन याच कालावधीत संपन्न झाला. इंदिरानगर, बिबवेवाडी येथील स्वामी ब्रह्मानंद शाखेवर स्वदेशी जागरण मंचाचे कार्यकर्ते श्री. प्रमोद बेहरे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. हिंगणे खुर्द येथील स्वामी दयानंद शाखेच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाला वर्धिनी कार्यकारिणीच्या सदस्या सौ. बागेश्री पोंक्षे, तर गंजपेठेतील स्वामी श्रध्दानंद शाखेच्या वर्धापन दिनाला वर्धिनी कार्यकारीणी सदस्य व प्रबोध उद्योगसमुहाचे संचालक श्री. रामभाऊ डिंबळे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तीनही ठिकाणी झालेल्या कार्यक्रमांना वर्धकांच्या पालकांबरोबर स्थानिक हितचिंतक व अन्य संस्थांचे मान्यवर कार्यकर्तेही उपस्थित होते.

स्वामी दयानंद शाखेतील एका वर्धकाच्या पालकांनी आवर्जून सांगितले की, त्यांचा पाल्य वर्धिनीच्या शाखेत यायला लागल्यापासून त्याच्या वागण्यात खूप बदल होतो आहे आणि त्याच्यामधील हे चांगले बदल त्याच्या शाळेतील शिक्षकांनाही जाणवले. त्यांनी पालकांना शाळेत बोलावून बदल होण्यामागील रहस्य विचारले. अर्थातच शाखेची माहिती त्यांनी या शिक्षकांना मोठ्या कौतुकाने सांगितली. हे निवेदन वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात करताना या पालकांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि आनंद कार्यकर्त्यांना शाबासकी दिल्याप्रमाणे वाटले.

**झालेली व्याख्यान सत्रे व अन्य कार्यक्रम**

| | |
|---|---|
| १) शिक्षण म्हणजे काय? | श्री. हेमंत पाठक / श्री. चंद्रशेखर कोष्टी |
| २) प्रदर्शनाला भेट (पुनवडी ते पुणे) | |
| ३) गुरुपौर्णिमा | श्री. अभय रबडे गुरुजी |
| ४) प्रश्न मंजूषा स्पर्धा | श्री. अरुण जोशी<br>श्री. र. ज. नरवणे सर |
| ५) दैनंदिनी कशी लिहावी. | श्री. धनंजय डोबे |
| ६) वैज्ञानिक खेळ | श्री. अभ्यंकर |
| ७) नेताजी सुभाषचंद्र बोस | श्री. दि. दा जोशी |
| ८) राजर्षी शाहू महाराज चरित्रकथन | |

**मानसिक विकास बैठक** - दर रविवारी होणाऱ्या या बैठकीत खालील विषय अभ्यासासाठी (वाचन व चर्चा) घेतले गेले -

१) मराठ्यांचा वैभवशाली इतिहास

२) श्री. शेखर सेन यांच्या स्वामी विवेकानंद चरित्रकथा वरील ध्वनिफिती.

३) धडपडणारा सतीश या कथेचे वाचन व 'पारंब्या' पुस्तकाचे वाचन

कोणत्याही मनुष्याची श्रद्धा विचलित करण्याचा प्रयत्न करू नका. - स्वामी विवेकानंद

## स्पर्धा परीक्षा केंद्र वृत्त

१५ जानेवारीपासून पी. एस. आय. मार्गदर्शन वर्ग सुरू झाला. २२ विद्यार्थ्यांनी या वर्गासाठी नावे नोंदवली.

ऑक्टोबर महिन्यात स्पर्धा परीक्षा केंद्राच्या पी. एस. आय. पूर्वपरीक्षेचा निकाल लागला. या परीक्षेत **३२** विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यात **१२** विद्यार्थिनी आहेत.

गुरूवार दि. २८ ऑक्टोबर या दिवशी स्पर्धा परीक्षा केंद्राने ५व्या वर्षात पदार्पण केले. श्री. यजुर्वेंद्र महाजन यांनी यादिवशी मुख्य परीक्षेच्या दृष्टीने इंग्रजीचा अभ्यास कसा करावा? यावर मार्गदर्शन केले.

''पी एस आय'' साठी ४० विद्यार्थी मुख्य परीक्षेची तयारी करीत आहेत तर राज्यसेवा परीक्षेचे २८ विद्यार्थी मुख्य परीक्षेची तयारी करीत आहेत.

विशेष म्हणजे दर गुरुवारी स्पर्धा-परीक्षा केंद्राची उपासना नियमितपणे होत असते.

स्पर्धा परीक्षा केंद्राच्या शैक्षणिक वर्षाला जूनपासून सुरूवात झाली यावर्षी २४ जिल्ह्यांतून आलेल्या ८० विद्यार्थ्यांनी या वर्गाचा लाभ घेतला. कृषी, कला आणि इंजिनिअरींग या विषयांकडे विद्यार्थ्यांचा जास्त कल दिसून आला. दैनंदिन प्रशिक्षणाबरोबर समान नागरी कायदा, कॅनकून परिषद, प्रशासनातले अनुभव इत्यादि विषयांवर चर्चा व व्याख्यानसत्रे झाली.

**मान्यवरांचे मार्गदर्शन :-**

* मे महिन्यातील परीक्षेपूर्वी शुभेच्छा कार्यक्रमाला निवृत्त सनदी अधिकारी श्री. अरूण भाटिया हे उपस्थित होते. जितकी वर्षे शासकीय सेवा, जवळपास तेवढ्याच वेळा बदल्या अशा स्थितीतही एखादा अधिकारी जनसामान्यांसाठी कसे काम करू शकतो, याची अनुभूती विद्यार्थ्यांना याप्रसंगी मिळाली.

* सप्टेंबरमध्ये झालेल्या पूर्व परीक्षा तुकडीला शुभेच्छा देण्यासाठी मा. श्री. बिंदूमाधव जोशी उपस्थित होते.

**अन्य उपक्रम** -

**रक्तदान शिबिर** -विभागाच्या वतीने १ फेब्रुवारीला रक्तदान शिबिर घेण्यात आले. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या सहकार्याने घेतलेल्या या शिबिरात २२ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

**शिष्यवृत्ती परिक्षा मार्गदर्शन वर्ग** - माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठीचे मार्गदर्शन केंद्रातर्फे देण्यात आले. १३ विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेतला. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गातील ज्येष्ठ विद्यार्थ्यांनीच माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन केले.

**केंद्राचे यश** -

या वर्षी वर्धिनीच्या केंद्रातील खालील विद्यार्थ्यांना यश प्राप्त झाले.

- श्री. सतीश माळी - केंद्रीय राखीव पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक पदी निवड
- श्री. गणेश शिंदे - पोलीस उपअधीक्षक (प्रथम श्रेणी अधिकारी) महाराष्ट्र पदासाठी निवड
- श्री. रोहित पाटील - फलाईंग ऑफिसर (CDS), लेफ्टनंट पदांसाठी निवड.

The difference between a helping hand and
an outstretched palm is only a twist of the wrist.

केंद्राचे यश .....

- ❋ श्री. संजय कावरे- महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळ येथे कनिष्ठ वैज्ञानिक पदावर निवड.
- ❋ श्री. संजय गायकवाड- बँकेची पी. ओ. परीक्षा उत्तीर्ण
- ❋ श्री. सचिन भालेराव- रेल्वे खात्यात डिझेल इंजिन ड्रायव्हर पदी निवड
- ❋ श्री. सचिन गावडे- केंद्रीय राखीव पोलीस दलात 'पोलीस सहायक अधीक्षक'पदी निवड.
- ❋ श्री. प्रशांत जगताप- कृषिविषयक बँक अधिकारी पदी निवड.

## फिरती प्रयोगशाळा विभाग वृत्त

**विज्ञान प्रदर्शन-**

सप्टेंबर महिन्यातील विशेष कार्यक्रमांतर्गत गणेशोत्सवाच्या निमित्ताने विज्ञान प्रदर्शनातील वर्धिनीच्या सहभागाचा उल्लेख करावा लागेल. बालविज्ञान चळवळीच्या अंतर्गत ज्ञानप्रबोधिनी, व न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड या शाळांमध्ये विज्ञान प्रदर्शन आयोजिले होते.त्यात 'स्व'-रूपवर्धिनीने सहभाग घेतला. ग्रामीण जनतेला अशा प्रदर्शनांची जास्त गरज आहे व खेडोपाडी अशी प्रदर्शने असावीत, अशी बोलकी प्रतिक्रिया यावेळी व्यक्त झाली.

"बघ, मी तुला सांगत होतो की ही शुद्ध फसवणूक आहे. ह्यात काहीतरी विज्ञान आहे. पण तुला पटले नाही. खुशाल हजार रुपये देऊन टाकलेस". हे संभाषण आहे, विज्ञान प्रदर्शनातली आपल्या वर्धिनीतील 'लव्ह मीटर' हे विज्ञान उपकरण बघताना, एका ग्रामीण दांपत्यामधील. तो पुढे सांगू लागला, "सर, असेच काहीतरी त्या माणसाजवळ उपकरण होते. गावातल्या स्त्रियांच्या हाताच्या कोपऱ्यावर ठेवून त्यातील द्रव उकळल्यासारखे दिसल्यावर बायका घाबरून त्याला औषधासाठी हजार रुपये असत, अन फसत होत्या." सर, तुम्ही गावात असे प्रयोग घेऊन या. सर्वांना खरे काय ते समजेल अन् फसवणूक थांबेल".

प्रदर्शनास सुमारे २००० ते २५०० लोकांनी भेट दिली. त्यात २५ सप्टेंबरला सकाळी सुमारे ४५० विद्यार्थ्यांनी हजेरी लावली.

प्रदर्शनाची क्षणचित्रे

- ❋ महाराष्ट्र विद्यालयाचे प्राचार्य श्री. भोसले यांच्या हस्ते उद्घाटन.
- ❋ प्रदर्शन चालू असतानाच प्रेक्षक-विद्यार्थी यांची कै. राजा रामण्णा यांना श्रद्धांजली.
- ❋ प्रदर्शनास अनेक नामवंत प्राध्यापक, प्राचार्य यांची भेट.
- ❋ भर पावसातही प्रेक्षकांचा उत्साही प्रतिसाद. प्रत्येक स्टॉलला आवर्जून भेट.
- ❋ सर्व कार्यकर्त्यांनी न कंटाळता उत्साहाने प्रथमपासून शेवटपर्यंत विचारलेल्या शंकांचे समाधान करीत हसतमुखाने प्रयोगांची दिलेली माहिती.
- ❋ प्रयोगासाठी लागणाऱ्या गरम पाण्याची सोय होम नर्सिंगच्या शिक्षिका सौ. कुलकर्णी यांनी केली. शेवटच्या दिवशी कार्यकर्त्यांसाठी त्या स्वत: खाऊ घेऊन आल्या.
- ❋ स्वयंसेवक म्हणून वर्धिनीच्या युवकांबरोबर विज्ञान दलाच्या सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने

> खिन्नता म्हणजे धर्म नव्हे, मग ते दुसरे काहीही असो. सर्वदा आनंदी व हसतमुख राहिल्याने तुम्ही ईश्वराच्या अधिक निकट जाल. - स्वामी विवेकानंद

तीनही दिवस प्रदर्शनात सहभाग घेतला आणि ह्या छोट्यांनी प्रयोगांचे स्पष्टीकरण फार सुंदर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

✻ प्रेक्षकांच्या काही बोलक्या प्रतिक्रिया

१. प्रयोग फारच छान आहेत. एक चांगला अभिनव उपक्रम, त्यामुळे चांगली माहिती मिळाली.

२. Experiments were simple & easy to understand. Explained very well.

३. अशाप्रकारची माहिती लोकांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचविण्याची आवश्यकता आहे. ह्या उपक्रमाद्वारे आमच्यासारख्या सामान्य माणसांनीही विज्ञान सोपे वाटू लागेल.

४. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनातील इतरांपेक्षा जास्त चांगली माहिती सांगितली, न कंटाळता व उत्साहाने .

५. Excellent ! Simplicity in explanation of basic facts of science. Keep it up.

**ग्रामशिबिरे**

मुळशी खोऱ्यातील ताम्हिणी, सुतारवाडी, आसदे, वाळेण, कोळवण या गावांमधील ५ वी ते ७ वी मधील विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या त्यांच्या गावात एकेक दिवसाचे शिबिर झाले. सुमारे १०५ विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले होते. श्री. दि. दा. जोशी सर यांनी ओरिगामीच्या माध्यमातून मुलांना कागदापासून विमान, सूर्य, होडी, पक्षी अशा गोष्टी बनवायला शिकविल्या. मुलांना रंजक आणि प्रेरणादायी कथा सांगितल्या श्री. प्रवीण महामुनी, श्री. दि. दा. जोशी यांनी; तर विज्ञान प्रयोगाचे सत्र रंगवले श्री. एस. पी. कुलकर्णी, कु. लता टिळेकर यांनी. सर्वच गावांमध्ये या शिबिराचे एक आकर्षण होते. नव्या गोष्टी ऐकायला, पहायला व शिकायला मिळणार असल्याने मुलांमध्ये प्रचंड उत्साह होता. लोकसभा निवडणुकीच्या कामांच्या धावपळीतही समारोपाच्या कार्यक्रमात उपस्थित रहाण्याचा काही शिक्षकांनी प्रयत्न केला.

**परिसरासाठी प्रयोगशाळा :**

फिरत्या प्रयोगशाळेचा उपक्रम वर्धिनीच्या वतीने १९९६ पासून सुरू आहे. मुळशी तालुक्यांमधील सुमारे बारा खेड्यांमधे आज या प्रयोगशाळा प्रकल्पाचे काम चालते. 'स्व'-रूपवर्धिनीच्या मंगळवार पेठेतील, वास्तूमध्ये जी प्रयोगशाळा आहे, त्याचा उपयोग अधिकाधिक वेळ कसा होऊ शकेल याविषयी गेल्या एक-दोन वर्षांपासून विचार चालू होता. वर्धिनीच्या शाखांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या गटांमध्ये आणून त्यांना प्रत्येकाला प्रयोग करण्याची संधी मिळावी, असे वाटतही होते व काही इयत्तांच्या विद्यार्थ्यांसाठी हे प्रत्यक्ष घडलेसुध्दा.

वर्धिनीच्या इमारतीच्या परिसरात अनेक खाजगी व महापालिकेने चालविलेल्या शाळा आहेत. या शाळांमधील ५वी ते ७वी इयत्तेतील निवडक विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोगशाळेत बोलावून विविध प्रयोग प्रत्यक्ष करण्यासाठी संधी द्यावी व हळूहळू त्यांच्यातील कुतूहल वाढवावे अशा हेतूने या उपक्रमाची सुरूवात करण्यात आली. बाबूराव सणस कन्याशाळा, रास्ता पेठ एज्यु. सोसायटीचे आर पी हायस्कूल व प्राथमिक शिक्षण मंडळाची प्राथमिक शाळा या तीन शाळांनी या उपक्रमात सहभाग दिला असून, दि. २८ फेब्रुवारी रोजी या उपक्रमाला सुरूवात झाली. श्री. सुनील कुलकर्णी हे या उपक्रमाचे काम पहात आहेत.

> जेव्हा स्वतःविषयीचा, स्वार्थाविषयीचा कोणताही विचार आपल्या मनाला शिवत नाही तेव्हाच आपल्या हातून सर्वोत्कृष्ट कर्म घडते. - स्वामी विवेकानंद

## शारदामणी महिला विभाग वृत्त

**१. पाकोळी बालवाडी**

'पाकोळी' बालवाडीचे वर्ग १४ जूनपासून सुरू झाले. बालवाडी सुरू होण्यापूर्वी २ ते ८ जून या कालावधीत या बालवाडीतील सर्व शिक्षिकांसाठी एका प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणक्षेत्रातील अनेक तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन या सर्व शिक्षकांना मिळाले. त्यामध्ये श्रीमती विद्याताई बापट, सौ. उज्ज्वलाताई गायकवाड, सौ. सुरेखाताई पेंडसे, सौ. माधवीताई पेंडसे, सौ. उषाताई दांडेकर व श्री. पु. ग. वैद्य यांचा समावेश होता. संघभावनेची आवश्यकता, भोवतालच्या विपरीत सामाजिक परिस्थितीत समाज घडवण्यासाठी आवश्यक असलेली प्रेरणा, स्त्रीशक्ती, योग्य बालशिक्षण होण्यासाठी बालवाडी शिक्षिकांची भूमिका, त्याचे महत्त्व, लहान वयात होणाऱ्या संस्कारांची ताकद अशा अनेक महत्त्वपूर्ण मुद्यांना स्पर्श करीत या सर्व मार्गदर्शकांनी उपस्थितांना नव्या जोमाने नव्या शैक्षणिक वर्षात काम सुरू करण्यासाठी प्रेरणा दिली.

**विशेष कार्यक्रम -**

※ २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीचा कार्यक्रम झाला.

※ २० ऑक्टोबर रोजी तीन गटांचा एकत्र भोंडला झाला. मुले नवीन कपड्यात उत्साहाने सहभागी झाली.

※ कोजागिरी पौर्णिमेस ऑक्टोबरमधील वाढदिवसांचे औक्षण झाले व कोजागिरी साजरी केली.

※ दसऱ्याला पाटीपूजन, सजावट, तोरण व रामाची गोष्ट सांगितली.


※ ऑक्टोबरमध्ये मोठ्या गटाची पालक सभा झाली. सर्वांना अभ्यासक्रमाबद्दल सांगितले.

नोव्हेंबर महिन्यातील मुलांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. सर्वांचे औक्षण करण्यात आले. मुलांनी 'रोज अंघोळ करीन,' 'रोज आईवडिलांना आणि देवाला नमस्कार करीन' असे संकल्प सांगितले. श्री. अविनाश जोशी यांच्या हस्ते मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या.

**प्रदर्शन -**

'बालवाडीत काय शिकवले जाते' याची कल्पना पालकांना यावी, यासाठी बालवाडी शिक्षिका व बालवाडी प्रशिक्षण वर्ग यांच्या वतीने एक प्रदर्शन मांडण्यात आले होते.

प्रदर्शनात बालवाडी साधने, विविध सण, नित्य जीवनातील गरजा, बारा बलुतेदारांची कामे, वीज-निर्मिती, जंगले, बाहुली-घरे व वेगवेगळी घरे, दुकाने यांची व अन्य काही प्रकल्पांची व्यवस्थित मांडणी केली होती. या सर्व गोष्टींच्या सहाय्याने मुलांना कसे शिकवले जाते, हे प्रदर्शन पहाण्यासाठी येणाऱ्या पालकांना समजावून दिले जात होते. अक्षरे, बाराखडी, उजळणी असा केवळ पुस्तकी अभ्यास न घेता त्याशिवाय अन्यही अनेक उपयोगी गोष्टी मुलांना वर्धिनीत शिकविल्या जातात, हे या बालवाडीचे वेगळेपण पालकांना खूप भावले. 'मुले या बालवाडीत



साक्षात मृत्यू जरी समोर उभा ठाकला तरी दुर्बलतेला स्थान देऊ नका. - स्वामी विवेकानंद

आल्यापासून त्यांच्यात खूप चांगले बदल कसे झाले, याचे रहस्य आज आम्हाला कळले ! अशी या पालकांची प्रातिनिधिक प्रतिक्रिया होती.

**दिवाळी -**

दिवाळी निमित्ताने सर्व वर्ग सुशोभित करण्यात आले. ताईंनी गोष्टींच्या साह्याने दिवाळीच्या प्रत्येक दिवसाचे महत्त्व सांगितले. वेगवेगळी गाणी व खेळ घेतले. मुलांनी भेटकार्डे व आकाशकंदील तयार केले. सर्व मुलांनी मिळून एक मोठा किल्ला तयार केला. नंतर मुलांना खाऊ दिला. घरी जाताना त्यांनीच केलेली भेटकार्डे, आकाशकंदील त्यांना दिले.

**शिबिर -**

पालकांच्या आग्रहामुळे व सहकार्यामुळे यंदा बालवाडीचा मोठा गट (१५ मुले) आणि पहिली दुसरीची मुले (३५ मुले) यांचे एक दिवसाचे निवासी शिबिर घेण्यात आले. दि. ५ नोव्हेंबरला सायंकाळी ४ वा. शिबिर सुरू झाले व दुसऱ्या दिवशी सायंकाळी ४ वा. शिबिर संपले.

शिबिरात गोष्टी, गाणी, प्रश्नमंजुषा, गोष्टींवरील प्रश्नोत्तरे, विविध खेळ, चित्रे आणि पणत्या रंगविणे, स्प्रे पेंटिंग असे अनेक उपक्रम झाले, खेळ, प्रश्नमंजूषा, आदर्श गट यांच्या स्पर्धा झाल्या. समारोपासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. मेधाताई राऊत आल्या होत्या.

मुलांनाही शिबिर खूप आवडले. विशेष म्हणजे घरची आठवण न काढता आणि रात्री न रडता मुले शिबिरात छान रमली.

**बालवाडी प्रशिक्षण वर्ग**

प्रशिक्षिकांना आदर्शपाठ दाखवल्या नंतर प्रत्येकी तीन पाठ झाले. तिसऱ्या पाठापर्यंत प्रत्येकीत खूप सुधारणा झालेली आढळून आली.

१८ ऑक्टोबर रोजी प्रशिक्षणार्थींच्या पालकांची सभा झाली. 'स्व'-रूपवर्धिनीचा उद्देश, तिचे काम, या वर्गाचा उद्देश व त्यातील तपशीलांवर मा. पुष्पाताई नडे यांचे बोलणे झाले. मोकळेपणाने पालकांशी चर्चा झाली.

डॉक्टर आनंद यादव यांच्या हस्ते मुकुंदनगर भागातील गरीब वस्तीत कष्टाचे जीवन जगणाऱ्या सौ. सुमन मोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आर्थिक अडचणीची कठीण स्थिती असतानाही त्यांनी कामाच्या ठिकाणी सापडलेले एक लाख रूपये योग्य व्यक्तीच्या ताब्यात दिले. जीवन कष्टमय असले तरी प्रामाणिक व्यवहाराचा आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला. संक्रांत उत्सवात त्यांच्या या आदर्शाला मानाचा मुजरा, या सन्मानाच्या निमित्ताने करण्यात आला.

वनवासी भागातील कामांचा अभ्यास करायला गेलेल्या गटाला एक प्रेरणादायी अनुभव ऐकायला मिळाला तो असा -

**... आणि फसवणूक थांबली**

जव्हार भागात काजूचे पीक मोठे आहे. व्यापारी मीठाच्या बदल्यात, अगदी कमी भावात काजूची पोती खरेदी करायचे;- नव्हे लाटायचे. काजू म्हणजे काय? बाहेरच्या जगात त्याची किंमत काय? याची या लोकांना काहीच कल्पना नव्हती.प्रगति प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी मग पाड्यापाड्यावर हिंडून त्यांना जागं केलं. सत्य परिस्थिती त्यांच्या लक्षात आणून दिली. आता योग्य भाव देऊन प्रगती प्रतिष्ठान काजू खरेदी करतं. त्यावर प्रक्रिया करण्याचा उद्योग वसतिगृहात चालतो. त्याच्यावर मिळणाऱ्या नफ्याचा उपयोग वसतिगृहासाठी केला जातो.

अगदी निरपेक्ष रहा तसेच परतफेडीचीही आशा बाळगू नका. ....- स्वामी विवेकानंद

**छंदवर्ग :**

बालवाडीच्या वर्गातून पहिल्या इयत्तेत जाणाऱ्या गटातील बालकांसाठी दरवर्षी तीन आठवड्यांचा एक छंदवर्ग आयोजित केला जातो. मातीकाम, चिकटकाम, ओरिगामी, चित्रकला, अभिनय गीते, स्तोत्र पाठांतर, गाणी-गोष्टी असे विविध विषय या छंदवर्गामध्ये होतात. मार्च एप्रिलमध्ये हा वर्ग झाला.

**नेत्र आरोग्य विषयक वस्ती सर्वेक्षण -**

ज्ञानप्रबोधिनी मेडिकल ट्रस्ट व 'स्व'-रूपवर्धिनीच्या संयुक्त विद्यमाने 'स्व'रूपवर्धिनीजवळील वस्त्यांमध्ये असलेल्या मुलांचे 'अ' जीवनसत्त्वाअभावी झालेले डोळ्यांचे आजार तपासणे ; रात्री कमी दिसणे, हळूहळू कमी दिसायला लागणे अशा आजारांच्या संदर्भात मुलांची तपासणी, कुटुंबातील लोकांची आरोग्याबद्दलची जाणीव-जागृती असे काम मंगळवार पेठेतील तेरा वस्त्यांमधून चालते. आजवर २०० मुलांची तपासणी झाली आहे. बऱ्याच जणांवर औषधोपचार चालू आहेत.

० ते ५ या वयोगटातील मुलांची वजन, उंची व मूलभूत तपासणी करून घेण्यात आली. ज्या बालकांचे लसीकरण अपूर्ण होते त्यांना वर्धिनीच्या माताबाल संगोपन केन्द्राची माहिती दिली या परिसरात मिळालेल्या दोन रातांधळ्या (Night Blindness) मुलांच्या उपचारांची, तसेच आवश्यकतेपेक्षा कमी वजन असलेल्या मुलांच्या उपचारांची व्यवस्था करण्यात आली.

प्रकल्पातील महिलांची दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाला भेट आयोजित केली होती. तिथे डॉ. आशा केळकर यांचे डोळ्यांची माहिती, त्यांची घ्यावयाची काळजी व जीवनसत्व 'अ'च्या अभावाने होणारे तोटे यासंबधी तर डॉ. अनुराधा वाकणकर यांनी कुटुंबनियोजनाची आवश्यकता व पद्धती या संबंधी मौलिक मार्गदर्शन केले.

**मूकं करोति वाचालम्**

रेश्मा परमार या विद्यार्थिनीला नीट बोलता येत नव्हते. तिच्या स्वरतंतूवर एक छोटीशी शस्त्रक्रिया केल्यानंतर तिला या केंद्रातील डॉ. सचिन गांधी यांच्या मदतीने बोलता येऊ लागले. बालवाडीतील या विद्यार्थिनीला बोलता येऊ लागल्याचा आनंद तिच्या सवंगड्यांनाच जास्त झाला. पालकही अत्यंत आनंदले !

**प्रौढ साक्षरता वर्ग -**

मरियमनगरमधील दोन वर्ग, आंबेडकर समाज मंदिरातील एक वर्ग व 'स्व'-रूपवर्धिनीतील एक वर्ग अशा चार वर्गामध्ये मिळून ४० महिलांचा प्रौढ साक्षरतावर्गात सहभाग आहे. प्रौढ साक्षरता वर्गातील महिलांनी बचतगटांमध्ये सहभाग घेतला आहे. स्वतःचा उद्योग काहींनी सुरू केला आहे. उद्योगासाठी लागणारा माल आणणे, हिशेब ठेवणे, १ ते १०० अंक काढणे व स्वच्छतेचे महत्त्व ओळखून त्याप्रमाणे वागणे एवढे मोठे बदल त्यांच्यात झालेत. मरियमनगरमध्ये या महिलांबरोबर दोन युवकही - ज्यांना पूर्वी शिकायची संधी मिळाली नाही असे येतात व त्यांचीही प्रगती चांगली आहे.

**संवादिनी गटांचा वर्धापनदिन**

अकरा डिसेंबर रोजी संवादिनी गटांचा वर्धापनदिन साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती आशाताई बापट होत्या.

अत्यंत आवश्यक गोष्ट जर कोणती असेल तर ती त्यागच होय. त्याग अंगी नसेल तर कोणीही परहिताचे कार्य प्राणपणाने करू शकणार नाही. - स्वामी विवेकानंद

सौ. स्नेहलताई मुसळे यांनी प्रथम ॐकार पूजन केले. सौ. वासंतीताई कुलकर्णी यांनी या प्रसंगी एक गीत सादर केले तर श्रीमती कमलताई टाककर यांनी संस्कृत प्रार्थना म्हटली. त्यानंतर प्रत्येक गटातील महिलांनी वेगवेगळे विषय घेऊन आपले सादरीकरण केले. त्यात पद्य, अभिनय, कवितावाचन, मनोगत, वाचन यांचा समावेश होता. या स्पर्धेत दोन गटांना पुढीलप्रमाणे बक्षिसे मिळाली.

१. कीर्तन - सौ. पूर्णा परांजपे

२. साक्षरतेचे गीत - सौ. वत्सला सरोदे

बक्षिसे देऊन यांचे कौतुक करण्यात आले.

श्रीमती आशाताई बापट यांनी ज्ञानप्रबोधिनीच्या संवादिनी गटामार्फत होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती सांगितली. श्रीमती विद्याताईंनी स्वतःची कविता म्हणून दाखविली. या कार्यक्रमाला ७५ महिला उपस्थित होत्या.

## आगामी विस्तार योजना

रौप्यमहोत्सवाच्या टप्प्यावर आजवर आपण काय मिळविले व कार्यकर्त्यांचे बळ किती या दृष्टिकोनातून आपली ताकद काय याचा अंदाज वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने आला. वेगवेगळ्या उपक्रमांमुळे आणखी कोणकोणते नवे उपक्रम सुरू करावे लागतील, विद्यमान उपक्रमांचा विस्तार कसा करावा लागेल याचाही अंदाज कार्यकर्त्यांना येतो. या सर्वांचा विचार करून आगामी काळात विस्ताराच्या काही कल्पना डोळयासमोर आहेत त्या प्रामुख्याने खालीलप्रमाणे -

**- शाखा विस्तार**

वर्धिनीचा जो मुख्य 'व्यक्ती विकसनाचा प्रकल्प' आहे, त्याचा अधिक विस्तार पुण्यात व पुण्याबाहेर वेगवेगळ्या ठिकाणी व्हावा अशी कल्पना आहे.

**शिबिर/प्रशिक्षण संकुल -**

पुण्यापासून १५ कि.मी. अंतरावर संस्थेने सहा एकर जागा घेण्याचे निश्चित केले असून, या जागेवर निवासी शिबिरांसाठी एक प्रसन्न वातावरण असलेले संकुल उभारण्याचा संस्थेचा मानस आहे. तसेच वर्षभर या जागेचा उपयोग विविध उपक्रमांसाठी व्हावा यासाठी काही योजना आहेत. यामध्ये -

* दहावी व बारावीची परीक्षा संपल्यानंतर सुमारे तीन ते चार महिन्यांची सुट्टी या मुलांना मिळते. या कालावधीत त्यांना उपयुक्त असे मार्गदर्शन वर्ग

  आणि

* ग्रामीण भागातील दहावी पास - नापास विद्यार्थ्यांसाठी शेतीपूरक उद्योगशिक्षण देणारे प्रशिक्षिण वर्ग या ठिकाणी चालावे अशी कल्पना आहे.

ध्यानात ठेवा की आपण जगाचे ऋणी आहोत. जग आपले ऋणी नाही. - स्वामी विवेकानंद

### बुद्धिबळ स्पर्धेत प्रथम क्रमांक

'स्व'-रूपवर्धिनीच्या बालशाखेतील वर्धक कु. मोहित शेणवी यास पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत ९ वर्षाखालील वयोगटात प्रथम क्रमांक मिळाला. पुणे महापालिका उपायुक्त श्री. शिरीष यादव यांच्या हंस्ते मोहितला हे बक्षिस देण्यात आले. या स्पर्धेतील पहिल्या दोन क्रमाकांच्या खेळाडूंची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.

## उत्साह वाढविणाऱ्या प्रतिक्रिया

### तुम्ही शिकवलेत म्हणून

भीमनगर सेवावस्तीच्या मरियमनगर येथे महिलांसाठी साक्षरता वर्ग चालतो. या वर्गाला येणाऱ्या महिलांची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे. ''तुम्ही आलात आणि आम्हाला शिक्षणाचे महत्त्व सांगितले. शिकवायलाही लागलात. आता या शिक्षणाचे महत्त्व समजते आहे. आम्ही आता शिवण वर्गाला जाऊ लागलो. नागरवस्ती योजनेखाली बचत गट सुरू केला; तेथे आम्ही सह्या करतो. बचत गटामुळे कर्जही मिळते. त्याचा व्याजदर काय आहे, हे आम्हाला कळायला लागले. शिक्षण नव्हते तेव्हा हे काहीच करता येत नव्हते. तुम्ही शिकवलेत म्हणून आमची ही प्रगती झाली.''

सौ. वत्सला सरोदे सौ. कौसल्या डाळिंबे सौ. सुवर्णा शिंदे

### हा स्तुत्य उपक्रम सतत चालू रहावा

'स्व'-रूपवर्धिनीचा फिरता प्रयोगशाळा हा एक अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे व तो सतत चालू रहावा. या उपक्रमामुळे आमच्या शाळेतील ५ वी ७ वी मधील मुलांना विज्ञानाबद्दल आवड निर्माण झाली आहे. प्रत्येक गोष्ट पडताळून पहाण्याची मुलांची वृत्ती वाढली आहे.

मुख्याध्यापक
जिल्हा परिषद शाळा, ताम्हीणी,
ता. मुळशी, जि. पुणे

> तुमच्या ठिकाणी देण्याची शक्ती आहे. तुमच्यापाशी जे असेल ते द्या आणि मग कशाचाच विचार करू नका. - स्वामी विवेकानंद


## आर्थिक आघाडीवरून.....

स्वयंसेवी संस्थांमधील कार्यकर्त्यांना/पदाधिकाऱ्यांना संस्थेचे काम सुरळीतपणे चालावे, नेमक्या दिशेने आणि गतीने चालावे यासाठी एकाचवेळी अनेक आघाड्यांवर लढावे लागते. यातील एखादी आघाडी जरा जरी कमकुवत झाली, तरी त्याचा परिणाम अन्य आघाड्यांवर कळत-नकळत होतोच. उद्दीष्टपूर्तीसाठी चालू असलेल्या उपक्रमांचे संचालन प्रभावीपणे होणे हे सर्वात महत्वाचे असते, यात शंका नाही. तरीसुध्दा ते तसे चालण्यासाठी आर्थिक आघाडीकडे दुर्लक्ष करून चालत नाही. ठेवींवरील व्याजासंबंधी होणाऱ्या शासकीय नियमांचे बरेवाईट परिणामही या आघाडीवर होत असतात. एकूणच आर्थिक आघाडी खूप लक्षपूर्वक सांभाळावी लागते, असाच सर्व स्वयंसेवी संस्थांमध्ये अनुभव येतो.

'स्व'-रूपवर्धिनीच्या वर्ष २००३-०४ मधील आर्थिक चित्राकडे पाहिल्यावर असं लक्षात येते की, यावर्षात देणगीरूपाने एकूण जमा झाले रु. १४,२१,८३७/- तर व्याज, फी आणि अन्य आवक यांच्या माध्यमातून जमा झाले एकूण रू. ७,१२,६७७/-

या सर्व जमा रकमेतून संस्थेच्या आवर्ती खर्चाची व्यवस्था मार्गी लागली. एकूण खर्च झाला रु. २५,००,२९१/- या खर्चाची विभागणी ''उद्दीष्टांवर झालेला खर्च'' आणि ''व्यवस्थापकीय खर्च'' अशी केल्यास हे चित्र खाली दाखविलेल्या आलेखाप्रमाणे आहे.

ठेवींवरचा व्याजदर खूप कमी झाला असल्याने आता गुंतवणूकसुद्धा त्यातल्या त्यात आधिक व्याजदर असलेल्या; परंतु सुरक्षित असलेल्या योजनांमध्ये करणे गरजेचे झाले आहे. त्याचवेळेस तूट येऊ नये म्हणून आणि वाढत्या कामाला अर्थबळ कमी पडू नये म्हणून आपल्या सर्वांचे सहकार्य फार महत्वाचे आहे. आजपर्यंत आपला प्रतिसाद जसा आश्वासक होता, तो तसाच यापुढेही राहील असा विश्वास वाटतो.





दानाच्या योगाने घेणारा नव्हे, तर देणाराच धन्य होत असतो. - स्वामी विवेकानंद

## आता यांचे केवळ स्मरण शक्य आहे

'स्व'-रूपवर्धिनीचे काम सुरू होण्यामागे, उभे राहण्यामागे आणि त्याचा योग्य दिशेने व गतीने विकास होण्यामागे ज्यांचा सिंहाचा वाटा होता असे संस्थापक श्री किशाभाऊ पटवर्धन व अन्य तीन श्रेष्ठ, समाजसमर्पित कार्यकर्त्यांना या वर्षभरात संस्था मुकली आहे. त्यांनी दाखविलेल्या वाटेने वर्धिनीचे काम पुढे नेणे हिच त्यांना खरी श्रद्धांजली होईल.







डॉ. बानू कोयाजी व सौ. चंद्राताई दलाया

श्री. दत्तोपंत ठेंगडी

### १) पद्मभूषण डॉ. बानू कोयाजी

डॉ. बानूबाई या देशातील आणि विदेशातील अनेक सामाजिक संस्थांच्या कामाशी समरस झालेल्या ज्येष्ठ मार्गदर्शक होत्या. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामात त्या सन्माननीय सभासद म्हणून गेली किमान वीस वर्षे सक्रीय होत्या. शारदामणि महिला विभागाचे काम विस्तारण्यासाठी त्यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य खूप मोलाचे होते. त्यांच्या सक्रीय योगदानामुळे शेकडो गरीब महिलांना स्वावलंबी होता आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या फिरत्या प्रयोगशाळेच्या प्रकल्पाला त्यांच्यामुळेच गती आली आणि प्रकल्पाचा विस्तारही झाला. समाजसेवा ही त्यांच्या रक्तात इतकी भिनली होती की, देहदान करून मृत्युनंतरही त्यांनी समाजाला उपयोगी पडण्याचा आपला वसा सोडला नाही.

### २) प्रा. सौ. चंद्राताई दलाया

वर्धिनीच्या कामात कै. सौ. चंद्राताई यांच्या मार्गदर्शनामुळे शारदामणि महिला विभागाची सुरूवातही झाली आणि कालांतराने या विभागाचा बहुआयामी विस्तारही झाला. कै. सौ. चंद्राताई दलाया या मुंबईमध्ये रहात असताना 'स्त्री हितकारिणी' या संस्थेच्या माध्यमातून मुंबईमधील गरजू महिलांना स्वावलंबी करण्याच्या कामात सहभागी होत्या. निवृत्तीनंतर पुण्यात आल्यावर त्या लगेचच वर्धिनीच्या कामात सहभागी झाल्या.

जिथे प्रामाणिक धारणा आहे आणि विशुद्ध हेतू आहे तिथे विजय हा ठरलेलाच आहे. - स्वामी विवेकानंद

अर्थशास्त्र या विषयातील त्यांच्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनाचा लाभ संस्थेच्या कार्यकर्त्यांना वेळोवेळी होत होता. अतिशय साधी राहणी ठेवणाऱ्या कै. सौ. चंद्राताई यांच्या मृदु स्वरांनी कार्यकर्ता कामासाठी अधिक प्रवृत्त व्हायचा.

### ३) श्री. दत्तोपंत ठेंगडी

भारतामधील लक्षावधी कामगारांच्या मनात हक्कांची जाणीव उत्पन्न करीत असतानाच त्यांच्या मनात देशाविषयीच्या कर्तव्याची जाणीव निर्माण करणारे, समाज जीवनात समरसता उत्पन्न व्हावी यासाठी सामाजिक समरसतेचा विचार रुजविणारे आणि देशाच्या आर्थिक स्थितीबाबत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करणारे ज्येष्ठ मार्गदर्शक श्री दत्तोपंत ठेंगडी यांचे याच वर्षात वृद्धापकाळामुळे दुःखद निधन झाले.

'स्व'-रूपवर्धिनीच्या इमारतीचे भूमीपूजन त्यांच्याच शुभहस्ते आणि ज्येष्ठ समाज सेविका कै.अनुताई वाघ यांच्या उपस्थितीत संपन्न झाले होते. 'स्व'-रूपवर्धिनीचे काम कसे चालावे, कोणती पथ्ये सांभाळावीत याविषयी त्यांनी वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले होते. वर्धिनीच्या कामाविषयी समाजामध्ये विश्वासार्हता (Credibility) उत्पन्न केली आणि कामातून ती टिकवली तर समाज आर्थिक बळ कमी पडू देणार नाही असा विश्वास त्यांनी कार्यकर्त्यांशी बोलताना व्यक्त केला होता. वर्धिनीच्या आजवरच्या प्रगतीत कै. दत्तोपंतांचे वेळोवेळी होणाऱ्या मार्गदर्शनाचा खूप मोलाचा वाटा आहे. वर्धिनीच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली.

या व्यतिरिक्त संस्थेच्या परिवारातील काही कुटुंबामध्ये याच वर्षामध्ये दुःखद घटना घडल्या. त्या सर्व कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

सौ. पुष्पा शंकर शीलवंत
सौ. अरूणा पंढरीनाथ शेलार
सौ. वसुधा श्रीधर वझे
श्रीमती यमुनाबाई काशीनाथ वेदपाठक
श्री. नारायणराव पुरंदरे
श्री. दशरथ वाईकर
श्री दिलीप राणा



इतरांच्या मदतीची अपेक्षा करणे व तशी याचना करणे, हे शुद्ध दुर्बलतेचे चिन्ह आहे. - डॉ. हेगडेवार

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

१) रामकृष्ण शाखा
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११.
शाखाप्रमुख - **श्री. मल्लेश मोरे**

२) अभेदानंद शाखा
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे-१६
शाखाप्रमुख - **श्री. तौसीफ शेख**

३) विवेकानंद शाखा
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर,
वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. प्रकाश चौधरी**

४) अखंडानंद शाखा
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय,
बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. विशाल शेडे**

५) सुबोधानंद शाखा
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत,
कर्वेनगर, पुणे - ५२
शाखाप्रमुख - **श्री. गिरीश फाटे**

६) योगानंद शाखा
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे-३०
शाखाप्रमुख - **श्री. प्रसाद भागवत**

७) भगिनी निवेदिता शाखा
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे-११
शाखाप्रमुख - **कु. ज्योत्स्ना शीलवंत**

८) दयानंद सरस्वती
अप्पर इंदिरानगर, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. प्रशांत कवडे**

९) श्रद्धानंद शाखा
महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय
घोरपडे पेठ, पुणे - ४२
**शाखाप्रमुख - श्री. उमेश बिबवे**

१०) ब्रह्मानंद शाखा
म.न.पा. शाळा क्र.१६८,
हिंगणे खुर्द, पुणे - ५१
शाखाप्रमुख - **श्री. धनंजय डोबे**

११) आजोळ
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **सौ. मंजूषाताई कुलकर्णी**
संपर्क - सोम. ते शुक्र. दु. १.४५ ते ५.००

१२) वीर अभिमन्यू बालशाखा
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **श्री. किशोर बेलोसे**

१४) शारदामणि महिला विभाग व 'पाकोळी' बालवाडी
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
प्रकल्पप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे**
सहायक : **सौ. स्वातीताई कारेकर**
संपर्क - सोम. ते शुक्र. स. १० ते १,
शनि. ९ ते १०.३०

१५) संगणक विभाग
विभागप्रमुख - **श्री अविनाश जोशी**
**श्री. निशिकांत वाईकर,**
संपर्क - सोम. ते शुक्र. दु. १२ ते सायं.५

१६) स्पर्धा परीक्षा व स्वयंवरोजगार मार्गदर्शन केंद्र
विभागप्रमुख - **श्री. संजय तांबट**
कार्यालयप्रमुख - **कु. दिपाली पवार,**
सहाय्यक - **कु. आरती बोराडे, श्री. विजय भोसले**
संपर्क - सोम. ते शनिवार दु. १२ ते ५ सायं ६ ते ८

१७) फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प
विभागप्रमुख - **श्री. सुनील कुलकर्णी**
सहाय्यक - **श्री. निशिकांत वाईकर, कु. लता टिळेकर**

१८) मृद्‌गंध गिरीभ्रमण गट
विभागप्रमुख - **वैद्य विनेश नगरे**
सहाय्यक - **श्री. चंदन हायगुंडे**

जो मनुष्य प्रतिकूल परिस्थितीवर मात करून काम करतो तोच अखेर यशस्वी होतो
व त्याचेच जगात नाव होते. - डॉ. हेगडेवार

कार्यालय २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

**सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, सौ. प्रगती तांबट**

(☎ २६१२१७०४, २६१३४३१०)

**संपर्क** - सोमवार ते शनिवार,

दु. ११.३० ते सायं. ५.३०

| दैनंदिन शाखांसाठी संपर्क : | प्रधान शाखापालक : |
|---|---|
| सोम. ते शुक्र. सायं.६.१५ ते रात्री ८.३०<br>शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०<br>रविवार स. ७.३० ते १०.०० | श्री. दि. दा. जोशी<br>जनता गृहरचना संस्था,<br>बिबवेवाडी, पुणे - ३७. |

## उपक्रम : - असे तास .... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ पर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८

२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२

३) अभ्यासिका : सकाळी ८ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योगशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४

२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५

३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं ६ ते रात्री ९

२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८

३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प ✲

२) अभ्यासिका

३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**रविवार सोडून अन्य दिवशी चालणारे उपक्रम**

१) बालवाडी

२) उद्योग शिक्षण वर्ग

३) साक्षरता वर्ग

४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प ✲✲

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) - प्रत्येक बुधवार

२) कुटुंब सल्ला केंद्र - प्रत्येक मंगळवार


✲ हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.

✲✲ हा प्रकल्प मुळशी तालुक्यातील निवडलेल्या बारा गावांमध्ये चालतो.

उर्वरीत सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.

स्वकर्तव्यरत राहिल्याने मनुष्य सर्वोच्च आणि पूर्ण अवस्थेस पोचतो - भगवान श्रीकृष्ण


# प्रार्थना





## प्रार्थना


नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥
हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥ १ ॥



जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुध्द बुध्दीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती - ध्यास हा ॥३॥



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणू रेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥

'मला काय उपयोग?' असे न म्हणता 'माझा काय उपयोग?' असे म्हणावे. - विनोबाजी भावे



ही पावले कुठे बरे जातात ?
मला याचा शोध घेऊ दे !
कुठेही पाहिलं तरी मला पावलेच दिसतात
आकाशाच्या निळ्या मुलायम रेतीत सुद्धा
पावलांचे ठसे उमटलेले मी पहातो.
अगदी दूरवर, जेथवर दृष्टी जाते तेथवर.

ती त्यांचा पाठलाग करते
येथील या हवेत, वातावरणात,
तुमच्या-माझ्या बोलण्यात, हसण्या-रडण्यात
पावलांचे ठसे उमटलेले मला दिसतात.

काही पावलांचे ठसे तर माझ्या हृदयात
मी जतन करुन ठेवले आहेत.
त्यांची मी पूजा करतो.
म्हणतो, ''कोणत्या वाटांनी तुम्ही गेलात,
सांगा ना मला!''
आवाज येतो, '' चल, तूही चल पावलांबरोबर''

श्री.म. म. देशपांडे


SWAROOPWARDHINEE MONTHLY
RNI No-MAHMAR-24511 / 13/ 1/ 2003-TC
Declaration No. PHM/SR/0235/VIII/2003 PHM/SR/ 236/VIII/2003
Regd No. L-2 / RNP/ M / 320 / 04-07 DT. OF PUBLICATION - 25 th evrey month
DT. OF POSTING - at PSO Mkt'yd Pune

प्रेषक-
अध्यक्ष,
'स्व'-रूपवर्धिनी
२२/१ मंगळवार पेठ
पारगे चौक, पुणे ४११ ०११

वर्ष पहिले, अंक बारावा

हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग. १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे येथे प्रसिद्ध केले.